CMYK

२४
रमजान मुबारक
आज का इफ्तार
६.४०
कल की सहेर
५.१४

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक १०४ वा फोन २३०१०१ दिनांक १४ मार्च २०२६ शनिवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# सुनेत्राताईंना कोणीतरी सांगा त्या बीडच्या पालकमंत्री आहेत; एकदा त्यांचे पाय जिल्ह्याला लागू द्या म्हणावं

**बीड दि.१३ (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्याचे पालकमंत्री कोण आहेत? असं जर एखाद्याला विचारलं तर त्याला सुद्धा लवकर नाव सांगता येत नाही. या पदा विषयीचा एवढा विसर आता लोकांना पडू लागला आहे. अजितदादा पालकमंत्री झाल्यानंतर मात्र त्यांचं नाव प्रत्येकाच्या तोंडात होतं परंतु त्यांच्या अपघाती निधनानंतर बीड जिल्ह्याचे पालकमंत्री पद त्यांच्या पत्नी सुनेत्राताई पवार यांच्याकडे देण्यात आलं आहे. पालकमंत्री झाल्यापासून त्या अजुनही बीड जिल्ह्यात आल्या नाहीत. कदाचित त्या बीडच्या पालकमंत्री आहेत, याचा विसर त्यांना पडला असावा. त्यामुळे कोणीतरी सुनेत्राताईंना सांगा त्या बीडच्या पालकमंत्री आहेत, एकदा त्यांचे पाय जिल्ह्याला लागू द्या म्हणावं. स्व.अजितदादांच्या रेल्वेच्या स्वप्नाला गती देण्याची हीच वेळ आहे.**

## बारामती एवढंच बीड जिल्ह्यावर दादांचं प्रेम होतं हे विसरु नका



बारामती प्रमाणेच दादांचे बीड जिल्ह्यावर प्रेम होते. स्वत: दादा जिल्ह्याचे पालकमंत्री झाले, याचा आनंद बीड जिल्ह्यातील प्रत्येकालाच होता, मात्र नियतीपुढे हे प्रेम जास्त दिवस टिकू शकले नाही, आता सुनेत्राताई तुम्ही जिल्ह्याच्या पालक आहात, मुंबईत बसून बैठक घेऊन जमत नसतं, जिल्ह्यात येऊन थोडं लक्ष घाला, जिल्हावासियांना तुमच्याकडून खूप मोठ्या अपेक्षा आहेत. स्व.दादांचा वादा ताई पूर्ण करतील असे प्रत्येकालाच वाटत आहे.

## अजितदादांच्या बीड-परळी रेल्वेच्या स्वप्नाला गती मिळेल

### ना.सुनेत्राताईंपर्यंत ही बातमी पोहोचवा



बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी अजितदादांची नियुक्ती झाली त्यावेळी जिल्ह्यातील प्रत्येकालाच आता खऱ्या अर्थाने जिल्ह्याचा विकास होईल असे वाटले होते. ज्या दादांच्या हाती राज्याच्या तिजोरीच्या चाव्या होत्या त्यांच्या हाती जिल्ह्याचे पालकत्व यावं ही बाब जिल्हावासियांसाठी अभिमानाची होती, मात्र त्यांच्या अपघाती निधनाने बीड जिल्ह्याला मोठा धक्का बसला, आता बीड जिल्ह्याच्या पालकत्वाचा वारसा सुनेत्राताईंकडे आला आहे. स्व.दादांप्रमाणेच सुनेत्राताई देखील बीड जिल्हयाचा विकास करतील अशी अपेक्षा आहे. परंतु त्या अजुनही जिल्ह्यात आल्या नाहीत. जिल्ह्याचा विकास आपल्यासाठी महत्वाचा आहे त्यामुळे वाचकांनी ही बातमी ना.सुनेत्राताईंपर्यंत पोहोचवावी. सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना टॅग करावी, शेअर करावी.

### जिल्ह्यातील राष्ट्रवादीकडेही थोडं लक्ष द्या

बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचीही थोडी वाताहात होऊ लागली आहे. रुसवे, फुगवे कुठेतरी अडचणीचे ठरु लागले आहेत. एकमेकांची तोंड न पाहण्यापर्यंत नाराजी वाढू लागली आहे. पक्ष संघटन बांधणीकडे कोणाचेच लक्ष नाही, एवढंच काय पक्षात कुठं काय चाललयं, कोणता पदाधिकारी काय करतोय, कोण कसले निर्णय घेतो याचा कसलाच ताळमेळ राहिलेला नाही. तेंव्हा ताई तुम्ही एकदा जिल्ह्यात या, जिल्ह्यातील विकास कामा बरोबरच पक्षाचाही आढावा घ्या.

### आ.धनंजय मुंडे, आ.प्रकाशदादांना सोबत घेऊन परळीपर्यंतचा रेल्वे प्रश्न मार्गी लावा



बीड जिल्ह्याचे पालकमंत्री झाल्यानंतर स्व. अजितदादांनी अवघ्या दोनच महिन्यात बीडपर्यंत रेल्वे आणली. अहिल्यानगर ते बीड ही रेल्वे सेवा सुरु व्हावी यासाठी त्यांनीच मोठे प्रयत्न केले होते. लवकरच परळीपर्यंत रेल्वे गेलेली दिसेल असे स्व.दादा त्यावेळी म्हणाले होते. मात्र सध्या बीड ते परळी रेल्वे मार्गाचे काम अतिशय संथ गतीने सुरु आहे. काही ठिकाणी पान २ वर

बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी सुनेत्राताई अजितदादा पवार यांची नियुक्ती झाल्यापासून त्या अजुनही जिल्ह्यात आल्या नाहीत, साहजिकच राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून त्यांच्यावर कामाचा व्याप मोठा आहे. मात्र पालकमंत्री म्हणून ताईंनी जिल्ह्यात येणं आवश्यक आहे. स्व.दादांच्या अपघाती निधनानंतर जिल्हा प्रशासनात कोणाचाच धाक राहिलेला नाही. जिल्ह्यातील शासन आणि प्रशासन नेमकं काय करतंय, कसे निर्णय घेत आहे यावर कोणाचेच नियंत्रण राहिलेले नाही. जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून नेमकी कोणती कामे चालू आहेत, कामे कुठपर्यंत आलेली आहेत या विषयी देखील कोणाचा कोणाला ताळमेळ नाही. स्व.दादा होते त्यावेळी किमान महिन्याला तरी जिल्हयात यायचे आणि एकाच दौऱ्यात प्रशासकीय यंत्रणा सुतासारखी सरळ करुन जायचे. मात्र आता कोणी विचारणारं नाही, हटकणारं नाही त्यामुळे प्रशासन मनाला वाटेल तसे वागत असल्याचे दिसून येत आहे. आपल्याला कोणीतरी विचारणारं आहे हा धाक प्रशासकीय यंत्रणेत निर्माण होणं आवश्यक आहे. ना.सुनेत्राताई पवार जिल्ह्यात आल्याशिवाय हे शक्य नाही. मुंबईत बसून व्हीसी द्वारे बैठक घेऊन काहीही साध्य होणार नाही, केवळ कागदाला कागद लावायचा आणि पान २ वर

## माजलगावमध्ये योगायोग गॅसकडून ग्राहकांची लूट?

### ९५० रुपयांची टाकी ११५० रुपयांना विक्रीचा आरोप



माजलगाव दि.१३ (प्रतिनिधी):- शहरातील एसपी योगायोग गॅस विक्रेत्याकडून ग्राहकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. शासनाने ठरवून दिलेल्या अंदाजे ९५० रुपयांच्या गॅस टाकीची विक्री तब्बल ११५० रुपयांना केली जात असल्याने सर्वसामान्य ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.
माजलगाव शहर व परिसरातील अनेक ग्राहकांनी सांगितले की, गॅस टाकी घेताना जास्तीचे पैसे आकारले जात आहेत. शासन दरापेक्षा सुमारे २०० रुपये अधिक रक्कम घेतली जात असल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे. महागाईच्या काळात आधीच त्रस्त असलेल्या नागरिकांवर हा अतिरिक्त आर्थिक भार टाकला जात असल्याने संताप व्यक्त पान २ वर

## खोकरमोहाचे सरपंच श्रीहरी मिसाळ अपात्र लाखो रुपयांच्या अपहार आला अंगलट

### अपहाराची ८० लाखांची रक्कम व्याजासह वसूल करण्याचे आदेश

**बीड दि.१३ (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्यातील शिरूर (कासार) तालुक्यातील खोकरमोहा ग्रामपंचायतीचे सरपंच श्रीहरी अर्जुनराव मिसाळ यांना विभागीय आयुक्तांनी दणका दिला आहे. १५ व्या वित्त आयोगासह विविध विकास निधीमध्ये भ्रष्टाचार आणि अनियमितता केल्याचा ठपका ठेवत, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी त्यांना सरपंच पदावरून अपात्र घोषित केले आहे. एवढेच नव्हे तर अपहार केलेली ८० लाख रुपयांची रक्कम व्याजासह वसूल करून शासन खाती भरणा करण्याची कार्यवाही करावी असे आदेशही विभाग आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत.**

खोकरमोहा येथील अर्जदार सुधाकर विठ्ठलराव मिसाळ यांनी सरपंच श्रीहरी मिसाळ यांच्याविरुद्ध विभागीय आयुक्त कार्यालयात अपील दाखल केले होते. या तक्रारीमध्ये सरपंचांनी खालील गंभीर गैरव्यवहार केल्याचे नमूद करण्यात आले होते.१५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून कोणतीही कामे न करता सुमारे ७४.०७,६५५ रुपयांचा संशयीत अपहार करणे. तंटामुक्त गाव योजनेच्या खात्यातून १०,९१००० रुपये काढून त्याचा अपहार करणे. ग्रामपंचायतीच्या मासिक सभा, महिला सभा आणि ग्रामसभांचे रेकॉर्ड उपलब्ध करून न देणे. ग्रामपंचायतीची कर वसुली खात्यात जमा न करता ती परस्पर वापरणे असे अनेक प्रकार समोर आले आहेत. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी केली होती. या चौकशी अहवालात सरपंच आणि तत्कालीन ग्रामविकास अधिकारी दोषी आढळले. विशेष म्हणजे, या गैरव्यवहाराप्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहितेच्या कलम ३४, ४०९ आणि ४२० अन्वये फौजदारी गुन्हा (FIR NO.0217/2024) आधीच नोंदवण्यात आला आहे. पान २ वर

## बीड-कोल्हापूर बसमध्ये पडदे नसल्याने प्रवाशांनी आगार प्रमुखांना धारेवर धरले

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- येथील बसस्थानकातून बीड-कोल्हापूर बस नियमीत सुटते. स्लीपर आणि सीटींगची व्यवस्था या बसमध्ये आहे. दि.१३ मार्च रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास ही बस कोल्हापूरला जाण्यासाठी बीड बसस्थानकात लागली. यावेळी प्रवाशी आतमध्ये गेले असता बसमध्ये एकही पडदा दिसून आला नाही. प्रवाशांनी बसमधील कर्मचाऱ्यांना याची माहिती दिली. त्यानंतर प्रवाशांनी पान २ वर

प्रथमच बीड शहरामध्ये
प्रसिध्द कॅन्सर विकार तज्ज्ञ
डॉ.अमोल कोटलवार
यांची भेट शनिवार दि.१४ मार्च २०२६ रोजी



MBBS, MD (Medicine),
DM (Medical Oncology),
MRCP (UK), ECMO, FCPM, PDCR, Thoracic Oncology (USA) Consultant Medical & Hemato-Oncologist
Mob.: 9727755847
संजीवनी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल
वैद्यनाथ प्लाझा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड ४३११२२
ओ.पी.डी.: दुपारी १२ ते ३०
खालील लक्षणे आढळून येणाऱ्या नागरिकांनी संपर्क साधावा
१) न भरुन येणारी जखम ओठ, जीभ, कातडी
२) कोठेही असणारी गाठ स्तन, गळा, चामडी
३) कोठूनही होणार अनियमित रक्तस्त्राव नाक, थुंकी, उलटी लाल-पांढरा पदर जाणे, आव, शौच वगैरे
४) अन्न गिळताना अडकणे, भूक मंदावणे, वजन घटणे, उलटे, उलटी होणे
५) संडास व लघवी यांच्या सवयीत बदल
६) आवाजात बदल, सतत खोकला येणे
७) तीळ, चामखीळ यात बदल होणे अगर चिघळणे
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध
मोफत उपचार
- सर्व शस्त्रक्रिया दुर्बिणीद्वारे
- सर्व प्रकारचे मुतखडे
- प्रोस्टेट ग्रंथीची शस्त्रक्रिया
- मुत्रमार्गाचे आजार
- किडनीचे आजार व त्यामध्ये सर्व प्रकारचे शोषणाचे आजार
लहान मुलांचे आजार व शस्त्रक्रिया
मोफत उपचार हाडांच्या आणि मणक्याच्या सर्व शस्त्रक्रिया उपलब्ध
नोंदणीसाठी संपर्क : 02442 - 225678
: अधिक माहितीसाठी संपर्क :
9066411414

ATHER
या गुढीपाडव्याला आनंदाची गुढी उभारूया, एथर घरी आणुया
शुभमुहूर्तावर ₹ 10 000 ची स्टेट EV सब्सिडी मुदतीपूर्वी मिळवा.




₹ 28 500* पर्यंतचा फायदा मिळवा.
₹1,09,999 आकर्षित ऑन रोड किंमत
आजच आपली एथर बुक करा.
एथर एक्झपेरियन्स सेंटर
बीड : जालना रोड बीड. 9112714445
अंबाजोगाई : तथागत चौक अंबाजोगाई 9014806771

### कोपरा, इरगाव, औरंगपूर कुकडा परिसरातून प्रचंड वाळू उपसा

## सिंदफणा नदी पात्रात वाळू माफियांची दादागिरी वाढली



### ग्रामस्थांनी घेतली जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षकांची भेट

बीड दि.१३ (प्रतिनिधी):– गेवराई तालुक्यातील औरंगपूर– कुकडा ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत मौजे इरगाव, कोपरा, औरंगपूर–कुकडा या गावा लगत असलेल्या सिंदफणा नदी पात्राची वाळू माफियांनी अक्षरश: चाळणी केली आहे. जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या साह्याने दिवसाढवळ्या अवैध वाळूउपसा केला जात असून वाळू माफियांची दादागिरी प्रचंड वाढली आहे. विशेष म्हणजे ग्रामपंचायतीने सुद्धा वाळू उपसा बंद करावा असा ठराव घेतलेला आहे, तरी देखील प्रशासनाच्या नाकावर टिच्चून वाळू माफियांकडून वाळुची तस्करी सुरुच असल्याने संतप्त ग्रा.पं.पदाधिकारी, ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन निवेदन दिले आहे. पान २ वर

## बीडमध्ये गोवा बनावटीच्या विदेशी मद्याची तस्करी उघड

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर-बीड रोडवरील चौसाळा शिवार परिसरात सापळा लावून गोवा राज्य निर्मित विदेशी मद्याची अवैध वाहतूक उघडकीस आणली. या कारवाईत ट्रकमधील चोर कप्प्यात लपवून ठेवलेले विविध ब्रँडचे तब्बल २०० बॉक्स विदेशी मद्य जप्त करण्यात आले असून ट्रकसह एकूण ५१ लाख ८८ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. पान २ वर

CMYK

# बळजबरीने धर्मांतर केल्यास १० वर्षांचा तुरुंगवास

## महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य अधिनियम २०२६मध्ये कठोर तरतुदी

मुंबई दि.१३ (प्रतिनिधी):- राज्यात गेल्या काही काळापासून प्रलोभने, फसवणूक आणि बळजबरीने होणाऱ्या धर्मांतराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. या बेकायदेशीर धर्मांतराच्या विळख्यातून सर्वसामान्य जनतेचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयक, २०२६ आणले आहे. बेकायदेशीर धर्मांतर केल्यास १० वर्षांपर्यंतचा कारावास आणि ७ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची कठोर तरतूद त्यात करण्यात आली असून, अशा प्रकरणांमधील गुन्हे अजामीनपात्र ठरवण्यात आले आहेत.

भारताच्या संविधानाने धर्मस्वातंत्र्याचा अधिकार दिला असला, तरी तो सार्वजनिक सुव्यवस्था आणि नीतिमत्तेच्या अधीन आहे. अनेक प्रकरणांत भोळ्याभाबड्या नागरिकांना नोकरीचे आमिष, मोफत शिक्षण, लग्नाचे वचन किंवा दैवी चमत्कार दाखवून धर्मांतरित केले जाते. हे रोखण्यासाठी आणि राज्याची सामाजिक वीण टिकवण्यासाठी हा कायदा आणला जात आहे.

विधेयकातील महत्त्वाच्या तरतुदी

१) आमिषाची स्पष्ट व्याख्या : भेटवस्तू, रोख रक्कम, नोकरी, धार्मिक संस्थांच्या शाळेत मोफत शिक्षण, विवाहाचे वचन किंवा अधिक चांगल्या जीवनशैलीचे प्रलोभन देणे म्हणजे आमिष मानले जाईल.

२) दोषींना कठोर शिक्षा : कलम ३ चे उल्लंघन केल्यास ७ वर्षांपर्यंत कारावास आणि १ लाख रुपये दंडाची तरतूद आहे. जर पीडित व्यक्ती अल्पवयीन, महिला किंवा अनुसूचित जाती-जमातीची असेल, तर ७ वर्षे कारावास आणि ५ लाख रुपये दंड आकारला जाईल.

३) पुनरावृत्ती केल्यास १० वर्षे कोठडी : ज्यांनी यापूर्वी असा गुन्हा केला आहे आणि ते पुन्हा दोषी आढळले, तर त्यांना १० वर्षांपर्यंत कारावास आणि ७ लाख रुपये दंडाची शिक्षा होईल.

४) संस्थांची नोंदणी रद्द होणार : जर एखाद्या संस्थेने (उदा. एनजीओ, अनाथाश्रम, रुग्णालय) बेकायदेशीर धर्मांतर घडवून आणले, तर त्या संस्थेची नोंदणी रद्द केली जाईल आणि संबंधितांना ५ लाख रुपये दंड व ७ वर्षे कारावास भोगावा लागेल.

धर्मांतरासाठी आता ६० दिवस आधी नोटीस

नवीन नियमांनुसार, जर कोणाला स्वेच्छेने धर्मांतर करायचे असेल, तर त्यांना जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे (सक्षम प्राधिकारी) ६० दिवस आधी तशी नोटीस द्यावी लागेल. धर्मांतरानंतर २१ दिवसांच्या आत घोषणापत्र सादर करणे अनिवार्य आहे. जर प्रक्रिया पाळली नाही, तर ते धर्मांतर शून्यवत (अवैध) मानले जाईल. लग्नासाठी केलेले धर्मांतर ठरणार बेकायदेशीर केवळ धर्मांतराच्या उद्देशाने केलेले विवाह न्यायालयाकडून रद्द ठरवले जातील. मात्र, अशा विवाहातून जन्मलेल्या बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यात आले असून, त्यांना आई-वडिलांच्या मालमत्तेत अधिकार मिळेल आणि आईची अभिरक्षाही कायम राहील.

तक्रार कोण करू शकते?

केवळ पीडित व्यक्तीच नव्हे, तर तिचे आई-वडील, भाऊ-बहीण किंवा रक्ताच्या नात्यातील कोणीही व्यक्ती पोलिसांत प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करू शकते. विशेष म्हणजे, हे सर्व गुन्हे 'दखलपात्र आणि अजामीनपात्र' असतील.

## वडवणी येथील ग्रामीण रुग्णालयाला कै.किसनभाऊ चाटे यांचे नाव देण्यात यावे-आ. प्रकाशदादा सोळंके



वडवणी दि.१३ (प्रतिनिधी):- राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशना दरम्यान मुंबई येथे राज्याचे आरोग्य मंत्री मा. श्री. प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत माजलगाव मतदारसंघातील आरोग्य सुविधांच्या उन्नतीसाठी विविध मागण्या मांडण्यात आल्या.

यामध्ये, वडवणी येथील ग्रामीण रुग्णालयाला कै. किसनभाऊ चाटे यांचे नाव देण्यात यावी, तसेच वडवणी येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी निधी, तेलगाव येथील ग्रामीण रुग्णालय इमारत बांधकामासाठी निधी, माजलगाव येथील ३० खाटांच्या ग्रामीण रुग्णालयाचे ५० खाटांच्या श्रेणीवर्धित उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर करण्यासाठी इमारत बांधकामासाठी ६३० लक्ष निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. माजलगाव येथील उपजिल्हा रुग्णालयासाठी आवश्यक पदनिर्मिती संदर्भातील प्रस्तावही सादर करण्यात आला असून, त्यास लवकरात लवकर मंजुरी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. यासंदर्भात आरोग्य मंत्री प्रकाश आबिडकर यांनी दादांच्या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून लवकरच मान्यता देण्याची आश्वासन दिले.

माजलगाव मतदारसंघातील नागरिकांना अधिक चांगल्या व आधुनिक आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी माजलगाव मतदार संघाची भाग्यविधाते आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशन आ.प्रकाशदादा सोळंके यांनी गाजवले, तरुणांच्या विवाह पासून ते सर्वसामान्य जनतेच्या आरोग्य त्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले विषय त्यांनी सभागृहात मांडून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी पोटतिडकिने प्रयत्न केला. जनतेचे आरोग्य अवधीत राहावे याकरिता शासनाचे लक्ष वेधून घेतले. राज्याचे आरोग्य मंत्री नामदार प्रकाश आंबिटकर यांच्यासोबत एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली यामध्ये मतदार संघातील, वडवणी, तेलगाव येथील ग्रामीण रुग्णालयाकरिता भरीव निधी द्यावा तसेच माजलगाव येथील उपजिल्हा रुग्णालयत ५० खटाची मंजुरी देण्यात यावी तसेच या ठिकाणची पद भरतीचे मान्यता देण्यात यावी, विशेष म्हणजे वडवणी येतील ग्रामीण रुग्णालयास कै. किसनभाऊ चाटे यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी लावून धरली अशी मागणी लावून धरली, दादांच्या मागणीला आरोग्यमंत्र्याकडून ग्रीन सिंगल मिळाले असून लवकरच हे काम मार्गी लागणार आहे,

**झाडे लावा झाडे जगवा**

## उद्या बीड येथे आध्यात्मिक शिबीर

बीड दि.१३ (प्रतिनिधी):- श्रीरामकृष्ण-विवेकानंद सेवा समिती बीड मंदिराच्या द्वितीय वर्धापन दिना निमीत्त रविवार दि.१५ मार्च २०२६ रोजी आध्यात्मिक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराची वेळ सकाळी ८.३० ते दु.१२.३० राहील.

प्रवचनाचा विषय यशस्वी जीवनासाठी अध्यात्मिकता हवी हा आहे. यास स्वामी विष्णुपादानंदजी महाराज (प्रमुख रामकृष्ण मिशन आश्रम, छत्रपती संभाजी नगर) हे मार्गदर्शन करणार आहेत. हा कार्यक्रम श्रीरामकृष्ण विवेकानंद सेवा समिती, बीड, एन.के.कॉलनी जवळ, खंडेश्वरी माता मंदिर रोड, आकाशवाणी समोर, बीड येथे आयोजित करण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी ९४२२३३२९४२, ९४२१३३५२५१, ९४२३३५२७९१, ९४२१६४६६४४ वर संपर्क साधावा.

## घरगुती गॅस सिलेंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा विभागामार्फत राज्यभर नियंत्रण कक्ष स्थापन



मुंबई दि.१३ (प्रतिनिधी):- इराण - इस्त्राईल युध्दाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडर सुरळीत पुरवठयाबाबत राज्य शासन विविध उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधता यावा, यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे. मार्च महिन्यामध्ये गेल्या सहा महिन्याच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध असून युध्दाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

पान १ वरून

### सुनेत्राताईंना कोणीतरी सांगा त्या बीडच्या पालकमंत्री आहेत...

इतिवृत्त लिहायचे या पलिकडे काहीच होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच सुनेत्राताईंना कोणीतरी सांगावं की त्या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री आहेत, असं म्हणण्याची वेळ आज बीडकरांवर आली आहे. तेंव्हा सुनेत्राताई तुम्ही स्वत: जिल्ह्यात या. इथं काय चाललयं याचा आढावा घ्या. बीडची बारामती करु हा शब्द स्व.अजितदादांनी जिल्हावासियांना दिला होता. दादांचा शब्द म्हणजे प्रमाण होतं त्यामुळेच दादांचा वादा पक्का असं स्वत: अजितदादा नेहमी म्हणायचे, त्यामुळे ताई तुमच्याकडून जिल्हावासियांना खूप मोठ्या अपेक्षा आहेत.

स्व.दादांचे बीड जिल्हा विकासाचे स्वप्न तुम्ही नक्कीच पूर्ण करताल.

### आ.धनंजय मुंडे, आ.प्रकाशदादांना सोबत घेऊन परळीपर्यंतचा रेल्वे प्रश्न मार्गी लावा

**भूसंपादनाचाप्रश्न अडचणीचा ठरु लागला आहे त्यामुळे पाहिजे तसे काम होत नाही. परिणामी परळीपर्यंत रेल्वे जायला मोठा उशीर होऊ लागला आहे. वडवणीपासून पुढे परळीपर्यंत रेल्वे मार्गाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी ना.सुनेत्राताईंनी अनुभवी अशा आ.धनंजय मुंडे आणि आ.प्रकाश सोळंके यांना सोबत घेऊन जिल्हाधिकारी, रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत बैठक लावावी.**

### खोकरमोहाचे सरपंच श्रीहरी मिसाळ अपात्र

या प्रकरणात तत्कालीन ग्रामविकास अधिकारी व्ही. एन. शिंदे यांना यापूर्वीच निलंबित करण्यात आले असून त्यांची विभागीय चौकशी सुरू आहे. दरम्यान दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि चौकशी अहवाल विचारात घेऊन विभागीय आयुक्तांनी गेल्या आदेशात म्हटले आहे की, श्रीहरी अर्जुनराव मिसाळ यांना सरपंच पदावरून तत्काळ प्रभावाने अपात्र करण्यात आले आहे.

अपहार केलेली रक्कम व्याजासह संबंधित दोषींकडून वसूल करून शासन जमा करण्याचे निर्देश जिल्हा परिषद बीडच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत. या निर्णयामुळे बीड जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर पावले उचलल्याने तक्रारदारांनी समाधान व्यक्त केले आहे.

### बीड-कोल्हापूर बसमध्ये पडदे नसल्याने...

आगार प्रमुखांना या संबंधी जाब विचारला. प्रवाशांनी आक्रमक होत आम्ही या बसमधून प्रवास करणार नाहीत अशी भूमिका घेतल्याने शेवटी आगार प्रमुखांनी त्या बसला शेवटी वर्कशॉपमध्ये पाठवून पडदे बसवून आणायला लावले, त्यानंतर बस कोल्हापूरकडे रवाना झाली. या सर्व गोंधळात प्रवाशांना मात्र तासभर ताटकळत बसावे लागले. आगार प्रमुखांनी किमान लांब पल्ल्याच्या बसेस सोडण्याआधी त्यातील सुविधा तपासायला हव्यात जेणेकरुन असे प्रकार पुन्हा होणार नाहीत.

### सिंदफणा नदी पात्रात वाळू माफियांची दादागिरी वाढली

कोपरा येथील अवैध वाळू उपसा करताना निष्पाप सोहम नारायण डरफे यांची सिग्मा हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर येथे मृत्यूशी झुंज प्रकरण ताजे असताना सिंदपणा नदीपात्रात वाळू माफिया यांनी धुडगूस घातला आहे. शेतकऱ्यांच्या मोटरी, पाइप लाइन तोडणे, लोकेशन खराब झाले की शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या पिकात जेसीबी, ट्रॅक्टर घालणे असे प्रकार सर्रास होऊ लागले आहेत. या बाबत शेतकरी काही बोलण्यास गेले तर त्यांना शिवीगाळ करणे, धमक्या देणे इथपर्यंत वाळू माफियांची मजल गेली आहे. वरिष्ठ अधिकारी खूप प्रामाणिक आहेत पण काही ग्रामस्तरावरील कर्मचारी व वाळू माफिया यांचे आर्थिक देवाण घेवाण असल्यामुळे या वाळू माफियांना बळ मिळते असाआरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे सदरील अवैध वाळू उपसा तात्काळ बंद करावा या मागणीसाठी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांची भेट घेतली, दोन्ही अधिकाऱ्यांनी अवैध वाळू उपसा प्रकरणी कडक कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. या बाबत प्रशासनाला दिलेल्या निवेदनावर बिपीन कल्याणराव डरफे, उपसरपंच रोहिणी अशोक गाडे, ग्रा.पं.सदस्य अमोल देविदास डरफे, शिवाजी दिलीप गाडे, छाया हनुमान डरफे, आरती अमोल गाडे, दामोधर लक्ष्मण गाडे यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### माजलगावमध्ये गॅस ग्राहकांची लूट...

केला जात आहे.

ग्राहकांच्या मते, गॅस एजन्सीकडे दराबाबत विचारणा केल्यास स्पष्ट उत्तर दिले जात नाही. काही ग्राहकांनी तर पावतीवर कमी दर दाखवून प्रत्यक्षात जास्त पैसे घेतले जात असल्याचा संशयही व्यक्त केला आहे. त्यामुळे संबंधित प्रकाराची चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

या संदर्भात नागरिकांनी अन्न व नागरी पुरवठा विभाग तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालून तपास करावा आणि दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच शासनाने निश्चित केलेल्या दरानुसारच गॅस टाक्यांची विक्री व्हावी, अशीही अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे माजलगाव शहरात चर्चेला उधाण आले असून, संबंधित अधिकाऱ्यांनी तपास करून सत्य परिस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी सर्वसामान्य ग्राहकांकडून होत आहे.

पान १ वरून

### बीडमध्ये विदेशी मद्याची तस्करी उघड...



दि.१२ मार्च २०२६ रोजी मिळालेल्या खात्रीलायक माहितीच्या आधारे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने सोलापूर-बीड रोडवर चौसाळा शिवार येथे सापळा रचला. यावेळी संशयित अशोक लेलँड कँपनीचा सहा चाकी ट्रक (क्र. MH-23 AU 7275) थांबवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये बनविलेल्या चोर कप्प्यामध्ये लपवून ठेवलेले गोवा राज्य निर्मित व महाराष्ट्रात विक्रीस बंदी असलेले विदेशी मद्याचे २०० बॉक्स आढळून आले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ), (ई),८०, ८१, ८३, ९० व १०३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा.आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई राजेश देशमुख, संचालक दक्षता व अंमलबजावणी प्रसाद सुर्वे, उप आयुक्त राज्य उत्पादन शुल्क संभाजीनगर संगीता दरेकर तसेच अधीक्षक बीड विश्वजीत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

सदर गुन्ह्याचा तपास निरीक्षक संजय कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली दुय्यम निरीक्षक आर. बी. खाडगीर करत आहेत. या कारवाईत दुय्यम निरीक्षक तातळे, काळे, सहायक दुय्यम निरीक्षक शेख तसेच जवान काशिनाथ डुकरे, प्रशांत मस्के, अशोक नागरगोजे, आदित्य खोसे, वैभव कोकाट, सुशील ढोले, सोमनाथ इथापे, करण बोरुडे, एम.एम. शेख, निशा नलावडे, सपना सय्यद, रीबिका ढाळे, रागिणी मुंडे, फुलझळके यांनी सहभाग घेतला. पुढील तपास सुरू आहे.

पान ६ वरून

### अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर सरकारचा निर्णय

राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत राज्य सरकार तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी दुकानात पाठवणार आहे. युद्धामुळे डिझेलचा तुटवडा निर्माण झाल्यास धान्य वितरणात अडथळा येण्याची शक्यता असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

### डॉ.ढवळेंनी आरसा दाखवताच

होते. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी संबंधित कृत्रिम पाणवठ्यांना भेट देऊन पाहणी केली असता ते पूर्णपणे कोरडे असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी नियमितपणे कृत्रिम पाणवठ्यांमध्ये पाणीपुरवठा करावा, अशी मागणी त्यांनी केली होती. या संदर्भातील बातम्या विविध दैनिकांमधून प्रसिद्ध झाल्यानंतर वनविभागाने याची दखल घेतली.वनविभागाचे अधिकारी महेश मेटे यांनी तत्काळ पावले उचलत संबंधित कृत्रिम पाणवठ्यांमध्ये टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केला आहे. त्यामुळे वन्यजीवांना मोठा दिलासा मिळाला आहे. उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना पाण्यासाठी मानवी वस्तीकडे धाव घ्यावी लागू नये तसेच अपघातांमुळे त्यांचे जीवितहानी टळावी यासाठी वनविभागाने उन्हाळाभर कृत्रिम पाणवठ्यांमध्ये नियमित पाणीपुरवठा करावा, अशी अपेक्षा डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

### नवगण महाविद्यालयात 'गीत बहार' कार्यक्रम उत्साहात

आले. प्रा. मनोज कुमार प्रकाश, प्रा. महेश गाडगे, प्रा. एस. आर. जोशी तसेच संजय वडगावकर यांनी विविध गाण्यांचे सादरीकरण करून उपस्थितांना संगीताचा आनंद दिला. जुन्या चित्रपट गीतांच्या सुमधुर सादरीकरणामुळे कार्यक्रमाला उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांनी उत्स्फूर्त दाद दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिलीप गिरहे यांनी केले, तर कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या प्रसंगी महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पशुसंवर्धनात आधुनिक तंत्रज्ञान आणून शेतकऱ्यांना सक्षम करणे गरजेचे-आ.धस

महादेव जानकर यांच्या कार्यकाळात सुरू असलेली जनावरांची विमा योजना सध्या बंद असल्याचे नमूद करत ती तातडीने पुन्हा सुरू करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच जनावरांच्या आरोग्य आणि प्रजनन व्यवस्थापनासाठी वापरल्या जाणाऱ्या स्मार्ट बेल्ट तंत्रज्ञानाकडेही त्यांनी सरकारचे लक्ष वेधले. तीन हजारांपासून ते तेरा-चौदा हजार रुपयांपर्यंत किंमत असलेल्या या उपकरणांमुळे जनावरांच्या आरोग्याविषयी महत्त्वाची माहिती मिळू शकते; त्यामुळे सरकारने या तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी काही योजना आखणार का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

कृषी विभागाच्या चर्चेत धस यांनी 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना' अर्थात पोखरा योजनेची व्याप्ती वाढवण्याची गरज अधोरेखित केली. सध्या एका गावात एकाच सार्वजनिक शेततळ्याला मंजुरी देण्याची मर्यादा आहे; मात्र ज्या गावांमध्ये मागणी अधिक आहे, तेथे एकापेक्षा जास्त शेततळ्यांना मंजुरी दिल्यास जलसंधारणाला मोठी चालना मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, कृषी खात्याच्या कामकाजाबाबत बोलताना धस यांनी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. पूर्वी पीक विमा घोटाळा, युरिया घोटाळा अशी अनेक प्रकरणे ऐकू यायची; मात्र भरणे यांच्या कार्यकाळात अशा प्रकारच्या घोटाळ्यांच्या बातम्या ऐकू येत नसल्याची सकारात्मक बाब त्यांनी नमूद केली. तरीदेखील २०२५ सालचा पीक विमा अद्याप अनेक शेतकऱ्यांना मिळालेला नसल्याने त्याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पशुसंवर्धन आणि कृषी क्षेत्राला अधिक बळकटी देण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, पशुविमा, उच्च दर्जाचे सिमेन, चारा व्यवस्थापन आणि सक्षम पशुवैद्यकीय सेवा या सर्व बाबींमध्ये ठोस धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याचे सांगत धस यांनी शेतकरी व पशुपालकांच्या प्रश्नांचा आवाज सभागृहात ठामपणे मांडला.

### पैठण - पंढरपूर पालखी मार्गाच्या रस्त्यामध्ये कंत्राटदार कंपनीचे भले करण्यामागे

असलेल्या पैठण- पंढरपूर पालखी मार्गाच्या कामात प्रत्यक्ष अंदाजपत्रकाला तिलांजली देत कंत्राटदार कंपनीकडून थातूर-मातूर कामाचा सपाटा लावण्यात आला आहे. विशेष म्हणजे याच मार्गावरून किमान ६०० मिटर राजूरी(नवगन)-चिंचपूर मार्गाचीही वाहतूक आहे. दोन्ही मार्ग एकत्रितरित्या शहरातून मार्गस्थ होत असल्याने नियोजीत रस्त्याच्या मजबुतीकरणाची हद्द किमन ३० मिटर आवश्यक आहे. मात्र कंत्राटदार कंपणी, सार्वजनिक बांधकाम विभाग (राष्ट्रीय महामार्ग संभाजीनगर) च्या संगणमताने कंत्राटादर कंपनीच्या भल्यासाठी केवळ २० मिटर निव्वळ रस्ता मजबुतीकरणाचे काम करण्यात येत आहे. नाली कामातही कंत्राटदार कंपनी आणि प्रशासनात विसंगती दिसून येत असून प्रशासनाकडून दोन्ही ४ मिटर नाल्याचा व्यास (रुंदी) सांगण्यात येत असला तरी प्रत्यक्षात मात्र प्रती नाली १.२५ प्रमाणे केवळ २.५ मिटर एवढा आहे. उर्वरित दिड मिटर रस्त्याचे काम कमी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समान्य नागरिकांच्याही नजरेतून झाकू शकत नाही. प्रत्यक्षात कंत्राटदार कंपनीकडून चक्क दीड मिटर म्हणजे जवळपास ५ फूट काम कमी करण्यात आल्याचे वास्तव नाकारता येऊ शकत नाही. नियोजीत २० मिटरच्या कामात किमान एक मिटर दुभाजक समाविष्ट केल्यास केवळ १९ मिटरचा मुख्य मार्ग राहणार आहे. बीड-आहिल्यानगर, पैठण -पंढरपूर या दोन्ही मार्गाची वाहतूक शहरीकरणातून याच मार्गावरुन होणार आहेत त्यामुळे संभाव्य काळात जिजामाता चौक ते प्राथमिक आरोग्य केंद्र हा ६०० मिटरचा मार्ग वाहतूकीसाठी 'मौत कुआ' होणार आहे.

नगरपंचायत अनभिज्ञ : सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेल्या हद्दीनुसार नगरपंचायतीकडून इमारत बांधकामांसाठी परवाने दिले जातात. येने, लेआऊट मध्ये स्पष्ट मार्गाच्या हद्दीचा उल्लेख अनिवार्य आहे आणि तो नगररचनाकार यांना करावाच लागतो. मात्र याबाबत नगरपंचायतीकडे विचारणा केली असता आमच्याकडे त्याचं काहीच नाही असे उत्तर मिळाले. अदृष्य हात कोणाचे? : शहरीभागातून मार्गस्थ होणार्या पालखीमार्ग व राज्यमार्ग एकत्रित दोन्ही मार्गाच्या कामाची हद्द सोडून निमुळत्या रस्ता कामाचा हट्ट कोणाचा? पायाभूत सुविधांच्या शाश्वत विकासाला सुरुंग लावण्याच हट्ट का? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे.

हद्दीत अतिक्रमणाला प्रोत्साहन : सार्वजनिक बांधकाम विभागाची ३० मिटर हद्द कायम करण्यात आली आहे. कंत्राटदार कंपनीकडून प्रत्यक्षात केवळ २२.५ मिटर (नाल्यासह) मार्गाचे काम सुरू आहे उर्वरित ७.५ मिटरच्या हद्दीत अतिक्रमणाला प्रशासनाकडूनच प्रोत्साहन दिले जात असल्याचे चित्र आहे.

### अखिल भारतीय सावित्री बिग्रेडचा हिरकणी

उपराजधानी नागपूर येथील आदर्श मंगल कार्यालय, शारदा चौक येथे दि.१५ मार्च रविवार रोजी सकाळी ११:०० वा. महापौर श्रीम.निताताई ठाकरे यांचेसह मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार असून या सोहळ्या मधे गोमळवाडा ता.शिरूर का. जि.बीड येथील रहिवाशी असलेल्या व जिल्ह्यात स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातुन उल्लेखनिय कार्य करणाऱ्या स्वच्छ भारत मिशन आयकॉन कु.योगीता आजीनाथ गवळी यांना यवर्षीचा हिरकणी पुरस्कारजाहीर झाला असून त्यांच्या रूपाने म्हणजेच शिरुरच्या लेकीचा राज्याच्या उपराधानीत सन्मान केला जाणार आहे.या पुरस्कारासाठी निवड झाल्या बद्दल योगीताचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### ना.पंकजाताईंचा पुढाकार; सीईओचे आश्वासन

पदवीधरची अशी ४८७ पदे अतिरिक्त होऊन त्यांना जिल्हयात जागा नसलेमुळे इतर जिल्हयात जाण्याची वेळ येऊ नये, यासाठी बीड जि.प. अंतर्गत १० शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख ७० पदे तर मुख्याध्यापक ९८ पदे रिक्त आहेत. सदरील पदे नियमानुसार टीईटी उत्तीर्ण शिक्षकांमधुन भरल्यास या अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाचा प्रश्न मार्गी लागणार आहे. याप्रसंगी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ. योगेश क्षीरसागर, नवनाथ शिराळे, जिल्हाध्यक्ष भाजपा युवा मोर्चा संजय आंधळे, माजी जि.प. सदस्य रामदास बडे, भाजपा जिल्हा सचिव शांतिलाल डोरले, प्रदीप बांगर, मान्यवर उपस्थित होते. उपोषणकर्ते शिक्षक सुभाष सारूक, मुकुंद घोडके, भागवत सोनवणे, जगदीश बनकर, श्री विजयानंद आघाव, अमोल काळे, जितेंद्र सांगळे, संजय पांढरे, गोरख कोल्हे, श्रीमती मनिषा कोल्हे, जयराम केंद्रे आदी उपोषणकर्ते उपस्थित होते.

### बीड जिल्हा वकील संघात ॲड.विलास जोशी यांचा वाढदिवस साजरा

सिद्धार्थ देवा शिंदे यांनी ॲड.विलास जोशी यांचा पुष्पहार श्रीफळ देऊन वाढदिवस साजरा केला व शुभेच्छा दिल्या. व या सुंदर अशा कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन ॲड.रईस पठाण यांनी केले.या कार्यक्रमात माजी अध्यक्ष प्रवीण राख माजी अध्यक्ष अविनाश गंडले यांच्यासह ॲड.सतीश गाडे जाधव ज्येष्ठ सदस्य सी डी देशमुख, ॲड. विजयकुमार देशपांडे, ॲड.रवींद्र देशमुख, ॲड.प्रबोध आपेगावकर, ॲड.बालाप्रसाद सारडा, ॲड.सुरेश वडमारे वकील संघाचे अध्यक्ष ॲड.सुभाष पिसुरे, ॲड.सुभाष काळे एडवोकेट राहुल आघाव, ॲड.भगवान कांडेकर, ॲड.यासेर पटेल, ॲड.विद्या गायकवाड एडवोकेट छाया वाघमारे एडवोकेट संगीता वीर, ॲड.सवई, ॲड.संगीता कोकाटे महिला प्रतिनिधी कुपकर, ॲड.पल्लवी बनसोडे, ॲड.स्वाती दानी, ॲड.अनिल धसे आदी सह अनेकांनी प्रत्यक्ष भेटून वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.

### चंपावती विद्यालयातील विद्यार्थ्यांची

वंजारे, कु.अद्विका दिघे, कु.सानवी सुर्वे, सातवी मधून योगेंद्र पवळ, चि.श्रेयस शेळके, चि.रिफान सय्यद, चि.ऋग्वेद गाडेकर, चि. अनिकेत जाधव, आठवी मधून कु.आनंदी कवठेकर, चि.उत्कर्ष घुमरे, चि.विराट परळकर, नववी मधून चि.गजानन जाधव, चि.विपुल मस्के, चि.राज लिंगे दहावी मधून, कु. नम्रता तांबे, या यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणारे गणित विभागाचे प्रमुख धाडवे सर, तसेच गणित शिक्षक वरपे सर, बिल्पे सर, खिस्ते सर, सौ.वैरागे मॅडम, देशमुख सर, सौ.शिंदे मॅडम, श्री.इंगोले सर या सर्वांचे अभिनंदन करण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

### चि.समर्थ श्रीपाद बोरगावकरची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड

माळेगांव दि १३ (प्रतिनिधी) -महाराष्ट्र राज्यातून २३०३ बाल वैज्ञानिकांची इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड यात बीड जिल्ह्यातील २२ विद्यार्थ्यांचा समावेश असून यातच येथून जवळच असलेल्या व केज तालुक्यातील युसुफ वडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता सातवी वर्गाचा विद्यार्थी चि. समर्थ श्रीपाद बोरगावकर याची इन्स्पायर अवॉर्ड बाल वैज्ञानिक म्हणून निवड झाली आहे.

त्याच्या यशाबद्दल संस्था सचिव दीपक दादा घुमरे, संस्था अध्यक्ष यु.बी. सुकाळे, विद्यालयाचे प्राचार्यश्री. भोसले ए.यु, पर्यवेक्षक शेख एम. बी, उच्च माध्यमिक विभागप्रमुख चव्हाण एन.एन संस्थेचे घुमरे प्रदीप सर त्याला मार्गदर्शन करणारे खराडे सर, गडकर सर, भांडे सर, धायगुडे सर, मुकदम सर, तरकसबंद सर, शिक्षक, प्राध्यापक, पालक असंख्य नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले आहे. व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# पार्श्वभूमी

### रिलायन्स न्यू एनर्जीकंपनी कडून सौरऊर्जेच्या नियमांबाबत मार्गदर्शन

सिरसदेवी दि १३ (प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील सागर इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये सोलर सेफ्टी विषयावर राष्ट्रीय सुरक्षा महिन्या निमित्त आयोजित या कार्यक्रमात रिलायन्स न्यू एनर्जी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सौरऊर्जेच्या सुरक्षित वापराबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली.या कार्यक्रमाला शाळेचे संस्थाचालक श्रीमंत सानप सर व सचिव संतोष पटाईत सर उपस्थित होते. रिलायन्स न्यू एनर्जी कंपनीचे अधिकारी संदीप जाधव सर, राहुल सर, विद्यापती सर, अक्षय सर व अर्पित सर यांनी विद्यार्थ्यांना सौरऊर्जेचे महत्त्व, पर्यावरण संरक्षणात तिचे योगदान तसेच सोलार उपकरणे वापरताना पाळावयाचे सुरक्षा नियम याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.यावेळी अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना सोलार पॅनेलजवळ खेळू नये, वायरिंगला हात लावू नये तसेच कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास तज्ज्ञांची मदत घ्यावी, असे सांगितले.



## अंमळनेर पोलीस स्टेशनमध्ये पोलीस अधिकाऱ्याने आरोपींसह वाढदिवस साजरा केला ? - सोनवणे

बीड दि १३ (प्रतिनिधी) - अमळनेर ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भार्गव सुदाम सपकाळ यांनी शासकीय कार्यालयीन वेळेत आणि शासकीय गणवेशात वैयक्तिक वाढदिवस साजरा केला. या समारंभात गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आरोपींसह अनेक व्यक्ती उपस्थित होत्या, ज्यामुळे शासकीय नियमांचे उल्लंघन झाले असल्याचा दावा करून यासंदर्भात ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ता तथा जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी पोलीस अधीक्षकाकडे या संदर्भात तक्रार केली आहे.

यासंदर्भात दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले की, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी अमळनेर पोलीस स्टेशनमध्ये हा कार्यक्रम झाला. उपस्थित आरोपींमध्ये विजय दिलीप पोकळे (पोलीस स्टेशन तोफखाना, अहमदनगर, गु.क्र. १२८७/२०२४, कलम ६४(२), ३५१(२)(३), ३५६(२), ३०८(२) सह झजउड्ज कायदा २०१२ कलम ४, ६) आणि उद्धव रामभाऊ पवार (पोलीस स्टेशन बीड ग्रामीण, गु.क्र. १९/२०१५ कलम ३, ७जीवन आवश्यक वस्तू अधिनियम) यांचा समावेश आहे.या व्यतिरिक्त वनरक्षक संदीप राठोड, अशोक विठ्ठल पवार, सुनिल बाळू आढाव, गोविंद श्रीपती गाडे, मा. सरपंच सुभाष बाबासाहेब पोकळे, नानासाहेब निवृती पवार, राजेंद्र शिवदास पोकळे, अमिर रफिक इनामदार, फिरोज शब्बीर बागवान, महेश रुद्रके, कृष्णा शिवाजी शेरकर, नितीन पोकळे यांसह अमळनेर पोलीस स्टेशनचे अधिकारी/अमलदार - पोलीस उपनिरीक्षक कृष्णा चव्हाण, पोलीस हवालदार संदीप सांगळे, पोलीस कॉन्स्टेबल योगेश बहिरवाळ, गोपीने शाखेचे पोलीस अमलदार श्याम खाडे, पोलीस कॉन्स्टेबल भारत राठोड, पोलीस हवालदार ज्ञानेश्वर डोंगरे आणि होमगार्ड दिलीप घोसीर हे उपस्थित होते.ऑल इंडिया पँथर सेनेने म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक आणि महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तन) नियम १९७९ नुसार शासकीय कार्यालयात वैयक्तिक समारंभ साजरे करणे पूर्णपणे प्रतिबंधित आहे. तरीही गंभीर गुन्हे दाखल असलेल्या आरोपींसह अशा प्रकारे वाढदिवस साजरा केल्याने पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली असून, अधिकाऱ्याचे अवैध संबंध आणि गाव गुंडांशी जवळीक असल्याचे स्पष्ट होते.तक्रारीत मागणी करण्यात आली आहे की, श्री. भार्गव सुदाम सपकाळ यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तन) नियम १९७९ नुसार विभागीय चौकशी नेमावी आणि शिस्तभंगाची योग्य कारवाई करावी. अवैद्य धंदा करणाऱ्या लोकांशी संबंध असल्याचे दिसून येत आहे तसेच या घटनेची सखोल चौकशी करून संबंधित इतर अधिकाऱ्यांवर/अमलदारांवरही आवश्यक कारवाई करावी.नितीन सोनवणे यांनी सांगितले की, महाराष्ट्र पोलीस दल उत्कृष्ट कामगिरीसाठी ओळखला जात असताना अशा वर्तनामुळे जनतेचा विश्वास डळमळीत होतो. म्हणून या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर कारवाई करावी, अशी विनंती पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. दरम्यान सदर घटनेला जवळपास तीन आठवड्याचा काळ होत आलेला आहे इतक्य उशिरा तक्रार देण्याचे कारण काय ? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### चौकशी करून निलंबन व्हायला पाहिजे

मागील काही वर्षाखाली पेठ बीड पोलीस ठाण्यामध्ये असेच एका आरोपीच्या वतीने एका पोलीस अधिकाऱ्याने वाढदिवसानिमित्त सत्कार स्वीकारला होता. यासंदर्भात चे व्रत प्रसिध्द झाले तसे तत्कालीन पोलीस अधीक्षकांनी कारवाईसाठी मागेपुढे पाहिले नव्हते तेव्हा या संदर्भातही चौकशी करून निलंबना सारखी कारवाई व्हायला पाहिजे असे मत देखील व्यक्त केले जात आहे.


## शहरात महामार्गावर वाहतुकीची सतत कोंडी होत असल्याने केज शहरात वळण रस्त्याची गरज

केज दि १३ (प्रतिनिधी)- खामगाव - पंढरपूर व अहमदपूर अहिल्यानगर हे महामार्ग केज शहरातून जात असताना या महामार्गाच्या जवळपास असलेल्या बाजारपेठा शासकीय रुग्णालय, यामुळे भवानी चौक, छत्रपती शिवाजीमहाराज चौक ते शिक्षक कॉलनी या भागात मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूला सतत गर्दी वाहनांची गर्दी झाल्याने वाहतुकीचे कोंडी होण्याचे प्रकार सतत घडत आहेत. विशेष म्हणजे केज शहर हे तालुक्याचे शहर, खेडेगावातून या शहरात कायम वास्तव्य करण्यासाठी बांधल्या गेलेल्या इमारती अर्थात वाढणारी नागरिकांची संख्या तेवढ्याच वाहनांची संख्या. हे सर्व पाहता के शहर पुर्वी सारखं मर्यादित शहर राहिलेलं नाही भौगोलिक परिसर वाढलेला आहे. अशा शहरातून महामार्ग कला परंतु महामार्गावरच शहरात वाहतुकीची कोंडी होण्याचे प्रकार घडत आहेत तेव्हा यावर उपाय म्हणून केज शहराला वळण रस्त्याची नितांत गरज असल्याचे मत आता नागरिक व्यक्त करू लागले आहेत. यादोन्ही मुख्य महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांच्या संख्येत वाढत आहे. हे दोन्ही मार्ग शहरात नेहमीच गर्दीने वाहनांची कोंडी झालेले असतात. पादचाऱ्यांना वाहनाने धडकून अनेक वेळा अपघात झाले आहेत. यामुळे वाहतुकीसाठी अधिकचा वेळही लागतो आणि जीवित हानी होत आहे. बाह्य वळण रस्ता तयार झाल्यास कमी वेळेत अधिकचा प्रवास करणे प्रवाशांना शक्य होईल. नेहमी रस्ते जाम होण्याची समस्या सुटणे शक्य होईल. खा. रजनीताई पाटील, खा. बजरंग सोनवणे, आमदार नमिता मुंदडा, नगराध्यक्षा डॉ. सौ. सीताताई बनसोड, रमेशराव आडसकर यांनी पुढाकार घेऊन नेहमी वाहतुकीची कोंडी होत असलेला प्रश्न सोडवावा अशी मागणी केली जात आहे. केज शहरातील शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी यांना या गर्दीमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. केज तालुक्याची मुख्य बाजारपेठ आहे.

ग्रामीण भागातून शेतकरी कामगार नोकरदार व्यावसायिक यांची शहरात नेहमीच गर्दी असते. पंचायत समिती, तहसील कार्यालय, शासकीय रुग्णालय, पोलीस स्टेशन, न्यायालय अशी प्रशासकीय कार्यालये असल्याने त्या कामाने निमित्त येणाऱ्या वाहनधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. त्यांनाही त्रास सहन करावा लागतो. व्यवसायिकांना तासनतास टाटकळत व्यवसाय बंद ठेवावे लागतात. मुख्य महामार्गा वरची वाहतूक बाह्य वळण मार्गाने वळवावी अशी मागणी केली जात आहे.

## राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता तर आंबा पिकाबाबत शेतकरी वर्गात चिंता वाढली

बीड दि.१३ (प्रतिनिधी)- राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात असल्याचे वृत्त पाहण्यात आल्यामुळे अशा पावसाने आंबा पिकाचे तसेच काढणीस आलेल्या रब्बी पिकाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जाऊ लागले आहे. सोशल मीडियासह व्हाट्सअप ग्रुप वर पसरट असलेल्या या बातमीमध्ये सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, खानदेश तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील नाकारता येत नाही. सध्याच्या अंदाजानुसार १८ ते २० मार्च दरम्यान या हवामान घडामोडींची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची



काढणी सुरु असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आल्याचे नमूद केल्याने बाकी कोणत्याही बाबतीत पूर्वतयारी ठेवता येऊ शकते परंतु गारपिटीचा पाऊस झाला तर यावर्षी मोठ्या प्रमाणात आंबे पिक भरले असताना या पिकाला फाटका बसण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने शेतकरी वर्ग चिंता व्यक्त करू लागला आहे..

## व्यापारी महासंघाने केज ठाण्यास दिलेल्या वॉटर फिल्टरचे लोकार्पण

केज दि १३ (प्रतिनिधी)- येथील व्यापारी महासंघाच्या वतीने केज पोलीस स्टेशनला वॉटर फिल्टर विथ कुलिंग सिस्टम भेट देण्यात आले तसे त्याचे लोकार्पण छोटेखानी कार्यक्रमात शुक्रवार दि.१२ मार्च रोजी करण्यात आले.

केज पोलीस स्टेशनला वेगवेगळ्या कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी अडचण लक्षात घेत व्यापारी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी यांनी व्यापारी संघाच्या वतीने केज पोलीस स्टेशनला वॉटर फिल्टर विथ कुलिंग सिस्टम देण्याची ईच्छा केज पोलीस स्टेशनचे इंचार्ज असलेले पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्याकडे व्यक्त केली असता उनवणे यांनी सकारात्मकता दर्शवली होती.त्यानुसार केज पोलीस स्टेशनच्या आवारात फिल्टर व कुलिंग मशीन बसवण्यात आले व फीत कापुन व श्रीफळ फोडून त्याचे लोकार्पण देखील लागलीच करण्यात आले

व्यापारी महासंघाच्या वतीने पोलीस स्टेशन मध्ये बसवण्यात आलेल्या वॉटर फिल्टर मुळे सर्वसामान्यांची पिण्याच्या पाण्याची सोय होण्यास मदत होणार असल्यामुळे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांनी व्यापारी बांधवांचे आभार व्यक्त करत कृतज्ञता व्यक्त केली. तर केजमधील व्यापारी बांधव नेहमीचसामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रामाणिक प्रयत्न नेहमीच करत आला असुन गरजेनुसार असेच उपक्रम भविष्यात राबविण्यासाठी आम्ही कटिबद्ध राहु अशी ग्वाही यावेळी महासंघाचे अध्यक्ष महादेव सूर्यवंशी यांनी दिली. यावेळी प्रा. हनुमंत भोसले,विकास अप्पा मिरगणे,पांडुरंग मिटकरी,सुहास चिद्रवार, निरंजन लोकरे,भूषण भन्साळी,गोविंद कणसे, सुरेश थोरात,गोविंद जाजू,नितीन काळे, प्रकाश जाडकर,रणजित निंगुळे,आदित्य मिटकरी, मयूर मांडलीया यांच्या सह अनेक व्यापारी बांधव व पोलीस कर्मचारी यांची यावेळी उपस्थिती होती.

## आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी मिलिंद सरपतेंची निवड

बीड दि १३ (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर बीड शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती (वंचित बहुजन आघाडी) स्थापन करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांच्या मार्गदर्शनाखाली समितीची निवड करण्यात आली.


या समितीच्या अध्यक्षपदी मिलिंद सरपते तर सचिवपदी सुशील काकडे यांची निवड करण्यात आली आहे. तसेच उपाध्यक्षपदी रोहन मगर, कोषाध्यक्षपदी आकाश साबळे यांची निवड करण्यात आली असून अमर ससाने, प्रफुल्ल बचूटे व लखन जोगदंड यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.बीड शहरात आंबेडकर जयंती उत्साहात व भव्य स्वरूपात साजरी करण्यासाठी समितीच्या वतीने विविध सामाजिक, शैक्षणिक व जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली. तसेच जयंती उत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## कडा जि.प.शाळेत समाजकंटकाचा डोक्यात पिशवी घालून धुमाकूळ,८ सीसीटीव्ही फोडले

### कडा पोलीस चौकीला नाईट राउंड साठी कायमस्वरूपी चार चाकी गाडीची गरज

आष्टी दि १३(प्रतिनिधी) - तालुक्यातील कडा येथील जिल्हा परिषद शाळेत अज्ञात व्यक्तीने रात्रीच्या दरम्यान येऊन वर्ग उघडत आठ सीसीटीव्ही कॅमेर्यासह ४ वर्ग खोल्याचे कुलूप तोडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला असुन याप्रकरणी आष्टी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. कडा परिसरात रात्रीच्या वेळी अनेक ठिकाणी चोऱ्यामाऱ्या वाढलेल्या असून कडा पोलीस चौकीला रात्रीची गस्त घालण्यासाठी स्वतंत्र चार चाकी गाडी देण्याची नागरिकांमधून मागणी केली जात आहे.

आष्टी तालुक्यातील कडा येथे जिल्हा परिषद केद्रीय प्राथमिक शाळा एक आहे. या शाळेत मंगळवारी रात्री साडेअकराच्या दरम्यान एका व्यक्तीने प्रवेश केला. बाहेरील व वर्ग खोल्यातील अनेक सीसीटीव्हीची तोडफोड व वर्ग खोल्याचे कुलूप तोडून शासकीय मालमत्तेचे नुकसान करण्यात आले. बुधवारी सकाळी शिपायाने गेट उघड्यावर हा प्रकार लक्षात येताच मुख्याध्यापकासह, शाळा व्यवस्थापन समितीला ही माहिती दिल्यानंतर पोलिस हवालदार भाऊसाहेब आहेर यांनी घटनास्थळी भेट दिली.कडा पोलीस चौकीतील पोलिसांना रात्रीच्या राऊंड मारण्यासाठी कधी कधी चार चाकी गाडी उपलब्ध नसते कडा परिसरातील अनेक गावात रात्रीच्या वेळी चोऱ्या माऱ्या वाढलेले असल्याने आष्टी पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष घालून कळा पोलीस चौकी साठी स्वतंत्र चार चाकी गाडी उपलब्ध करण्याची नागरिकांमधून मागणी होत आहे तरी सदरील घटनेची मुख्याध्यापक उध्दव सोनवणे यांनी आष्टी पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध तक्रार दाखल केली आहे.दोन वर्षापुर्वी देखील याच शाळेतील सीसीटीव्ही कॅमेर्याची तोडफोड करून टीव्ही चोरीला गेल्याची घटना घडली होती. याठिकाणी अधूनमधून असे प्रकार घडत असल्याने नेमकं यातून काय साध्य करायचे याचा उलगडा होण्यासाठी आरोपीचा शोध घेणे आवश्यक आहे.



## कोळगाव खडकी मानकापूर रस्त्याला निधी उपलब्ध नसल्याने काम बंद

### खड्डे अन् खडीवरुनच करावा लागतो नागरिकांना प्रवास

कोळगाव, दि.१३(प्रतिनिधी) - गेवराई तालुक्यातील कोळगाव -खडकी - मानकापूर या रस्त्याची सध्या पुर्णतः वाट लागली आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर असलेले एक वर्षापासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याचे काम संथगतीने होत होते. याविषयी इंजिनिअर नितीन वीर यांना विचारले असता त्यांनी सांगितले की ह्या रस्त्याच्या कामासाठी निधी उपलब्ध नाही. परंतु काम बंद ठेवल्याने तोपर्यंत खराब रस्त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जाण्याची वेळ आली आहे.

गेवराई तालुक्यातील कोळगाव खडकी मानकापूर हा रस्ता नारायणगडावर जाण्यासाठी सोईस्कर असल्याने रस्त्यावरून नागरिकांना वाहतुकीसाठी प्रवास सोपा व्हावा म्हणून स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार आमदार यांच्या मागणीने मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर झाला होता. दरम्यान हा रस्ता नवीन करण्यासाठी काम बाळराजे कंट्रक्शन या गुत्तेदार कंपनी मार्फत काम सुरू आहे. पण या रस्त्यांवर अनेक महिन्यांपासून मोठमोठे खड्डे पडले असून, अनेक ठिकाणी माती मिश्रित मुरुमाचा वापरामुळे धुळ फुफाट्याचा लोट उडत आहे. ज्यामुळे पादचारी आणि दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. असे संतोष थोरात, अनु जिजा लोंढे, ग्रामस्थांनी सांगितले. मानकापूर खडकी



कोळगाव हा रस्ता गुत्तेदार यांच्या मनमानी कारभारामुळे मागील अनेक महिन्यांपासून काम बंद असून रस्ता उकरुन ठिक ठिकाणी रस्त्यावरच मुरूम खडीचे ढिगारे टाकल्याने वाहनधारकांना धुळीचा फुफाट्याचा त्रास सहन करावा लागत आहे. तर दुसरीकडे हा रस्ता का बंद पडला आहे याचे अधिकाऱ्यांना ही भान नसून उंटावरून कारभार करणारे संबंधित इंजिनियर, वरिष्ठ अधिकारी आणि गुत्तेदार एस सी च्या गाडीत बसून तोंडाला मास्क लावून वरूनच रस्त्याची पाहणी करून मूग गिळून गप्प आहे. असा आरोप सोमनाथ लोंढे यांनी केला.

## बंडू (अण्णा) पवार यांच्याकडून इफ्तार पार्टी संपन्न

पिंपळवंडी दि.१३ (प्रतिनिधी)- पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील युवा नेते बंडू (अण्णा) पवार यांच्या वतीने मुस्लिम बांधवांच्या रमजान या पवित्र उपवासाच्या महिन्यानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे दि.१२ २०२६ गुरुवार रोजी पिंपळवंडी येथील मज्जिद मध्ये रोजा इफ्तार पार्टी संपन्न झाली.या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसह हिंदू बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहून इफ्तार पार्टीचा आस्वाद घेतला. यावेळी शेख युसूफ सर,मौलाना लियाकत राज,शेख बाबामिया,शेख शफिक,बंडू अण्णा पवार,उपसरपंच दादासाहेब पवार तसेच अशोक गुजर,पत्रकार बबनराव उकांडे,



भाऊसाहेब पवार,के.टी.पवार आणि सुदाम मोरे,राजू माळी,राहुल पवार, राजू मोरे,गोकुळ राऊत,अशोक तात्या पवार,बशीर शेख,सय्यद सलीम,गयास शेख,कलीम सय्यद, तोशिफ शेख,अमोल राऊत,अरबाज शेख आदि उपस्थित होते.

## जयदत्त क्षीरसागर यांना रोटरी क्लब ऑफ बीडचा चंपावतीरत्न पुरस्कार

बीड दि १३ (प्रतिनिधी) - रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने देण्यात येणारा मानाचा चंपावतीरत्न पुरस्कार यंदा राज्याचे माजी मंत्री जयदत्तआण्णा क्षीरसागर यांना देण्यात येणार आहे दि २२ मार्च रोजी हॉटेल निलकमल मध्ये ग्लोबल विकास ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी मयंक गांधी आणि रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२चे गव्हर्नर रो सुधीर लातुरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल याप्रसंगी रोटरीचे डिस्ट्रिक्ट लर्निंग फ़ेसीलेटर रो ओम मोतीपवळे रोटरी माजी गव्हर्नर रो हरीश मोटवाणी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.बीड शहराच्या शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गणमान्य व्यक्तींना हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. यापूर्वी हा पुरस्कार अभिनेते मकरंद अनासपुरे, स्व. केशरबाई क्षीरसागर



वे शा. सं. धुंडीराज महाराज पाटांगणकर, श्रीहरी तुंगार, रामप्रसाद राठी, स्व. मोतिराम वरपे, डॉ श्रीहरी लहाने सुभाषचंद्र सारडा, शिवाजीराव पंडित, संपादक स्व. नामदेव क्षीरसागर आदी मान्यवरांना देण्यात आला आहे.या पुरस्कार सोहळ्यास शहरातील सर्वच सामाजिक आणि सेवाभावी संस्थेतील सदस्यांनी तसेच नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रोजेक्त चेअरमन सीए सुरेश लड्डा रोटरी क्लब अध्यक्ष विकास उमापूरकर सचिव सुमित जैस्वाल यांनी केले आहे.

## अंबाजोगाई येथे आज हिंदू संमेलन

अंबाजोगाई दि १३ (प्रतिनिधी) - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त येथील संत सावता माळीनगर, हनुमान मळा, दुर्गा कॉलनी, कुलस्वामिनी कॉलनी, ज्योती नगर, श्रीकृष्ण कॉलनी, या भागातील सकल हिंदू समाजाच्या वतीने हिंदू संमेलनाचे शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४ वाजता हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे

या हिंदू संमेलनाच्या अध्यक्षपदी ह.भ.प.अमोल महाराज घोडके यांची तर समिती सदस्य म्हणून प्रा.विनय राजगुरू, डॉ.बालासाहेब मुंडे, डॉ.देविदास खोडेवाड, सतीश वांगे, सतीश बलुतकर, श्रीकांत काळे, राजेंद्र शेप, सुरेखा काळे, ज्योती शिंदे, लक्ष्मी घुगे, अनुजा गुडे, अरूण पत्की, डॉ.रोहिणी अंकुश, डॉ.मनीषा रोकडे, अनिल राठोड आदींची निवड करण्यात आली आहे. हे हिंदू संमेलन संत सावता माळी नगरातील स्वयंवर मंगल कार्यालय या ठिकाणी आयोजित केले आहे. दरम्यान सायंकाळी ठीक ४ वाजता हिंदू संमेलनाची बालगोपालांच्या दिंडीने सुरूवात होईल. तरी सर्व हिंदू जनजागृतीसाठी सदर स्वामी समर्थ वस्तीतील व उपरोक्त उल्लेख केलेल्या वसाहतीमधील सर्व महिला, स्वयंसेवक, कार्यकर्ते, बंधू - भगिनी यांनी कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने आवर्जून उपस्थित रहावे. असे आवाहन संमेलन समितीच्या वतीने करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या हिंदू संमेलनांचे आयोजन शहरातील इतर वस्तीच्या माध्यमातून देखील करण्यात येणार आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज समाधान शिबिराचा लाभ घ्या–उपजिल्हाधिकारी वजाळे

घाटनांदूर दि.१३(प्रतिनिधी)-छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने स्वराज्याचा ध्यास लोककल्याणाचा संकल्प या भूमिकेतून राज्याचा महसूल विभाग पुढील तीन महिन्यात विशेष अभियान राबविणार आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान अंतर्गत अंबाजोगाई, घाटनांदूर आई मंगल कार्यालय रेल्वे स्टेशन रोड येथे शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी सकाळी ९:ते दुपारी १२: या वेळेत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उपजिल्हाधिकारी वजाळे यांच्या मार्गदर्शनाखाली घाटनांदूर मंडळातील विविध समाधान शिबिरे घेण्यात येणार आहेत. वरील ठिकाणी होणाऱ्या शिबीरांमध्ये नागरिकांना पुढील प्रमाणे सेवा देण्यात येणार आहेत. विधवा महिलांचे, दिव्यांग लाभार्थ्यांचे आणि वृध्द लाभार्थ्यांचे अर्ज भरुन घेणे, संजय गांधी योजना व श्रावणबाळ योजना अर्जाच्या अनुषंगाने आवश्यक सहकार्य व कागदपत्रे पडताळणी करणे, लाभार्थी यांचे रहिवास प्रमाणपत्रासंबधी अर्ज भरुन घेणे, लाभार्थी यांचे उत्पन्न प्रमाणपत्रासंबधी अर्ज भरुन घेणे, उत्पन्न प्रमाणपत्राच्या अनुषंगाने ग्राम महसूल अधिकारी यांचा अहवाल घेणे, संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ राज्य सेवा निवृत्ती वेतन योजना समिती बैठकीमध्ये त्रुटी दर्शविण्यात आलेल्या प्रकरणामध्ये त्रुटी पुर्तता करुन घेणे, लाभार्थीचे हयात प्रमाणपत्रबाबत मार्गदर्शन करणे व सहकार्य करणे, ज्येष्ठ नागरिक यांचे ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्रकरिता अर्ज भरुन घेणे, लाभार्थी यांच्या पेन्शनच्या अनुषंगाने आधार संबधी त्रुटीची पुर्तता करुन घेणे, दिव्यांग लाभार्थ्यांच्या पेन्शन संबधी यूडीआयडी कार्ड त्रुटीची पुर्तता करून घेणे इ. सेवा या शिबिरात देण्यात येणार आहेत.महाराष्ट्र शासनाच्या योजना जनसामान्यां पर्यंत सुलभ रित्या पोहचण्यासाठी योजनेचा लाभ एका छताखाली मिळण्याच्या उद्देशाने शासनाने छत्रपती शिवाजी महाराज महास्वराज समाधान शिबीर चे आयोजन महसुल मंडळ घाटनांदूर येथिल आई मंगल कार्यालय, स्टेशन रोड घाटनांदूर येथे दि. १४.मार्च २०२६ शनिवार रोजी आयोजित केला जात आहे. यामध्ये महसूल प्रकारचा निपटारा जसे कलम १५५ ची प्रकरणे पांदन रस्ते, नाव दुरुस्ती, ठठ कोडच्या सातबारा वाटप , आयुष्यमान योजना, परिवहन विभागाची मोफत प्रवास योजनेचे कार्ड नोंदणी , आधार कार्ड, नोंदणी दुरुस्ती, कृषी विभागाच्या योजना, या सर्व योजनेचा लाभाची नोंदणी व व लाभ एकाच छताखाली सुलभरित्या मिळणार असून याचा ज्यास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा. असे अव्हान उपविभागीय अधिकारी, अंबाजोगाई ; दिपक वजाळे , तहसीलदार विलास तरंगे, मंडळ अधिकारी श्रीमती घुगे, ग्राम महसूल अधिकारी सिरसाट, ग्रामपंचायत अधिकारी फड यांनी केले. हे शिबिर नागरिकांना त्यांच्याच विभागात तत्पर व सुलभ सेवा देण्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण शिबिर आहे. घाटनांदूर मंडळा विभागातील जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन अंबाजोगाई विभागाचे तहसिलदार विलास तरंगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## सफाई कामगारांच्या प्रश्नावर राज्यमंत्री शेरसिंग डागोर यांची जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकाऱ्यांशी चर्चा

### पत्रकार ढाका यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट



बीड दि १३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र राज्य सफाई कर्मचारी आयोगाच्या अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे सफाई कर्मचाऱ्यांच्या विविध प्रश्नांबाबत महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली.

बैठकीत लाड-पागे समिती अंतर्गत वारसांना नोकरी देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच आवास योजनेचा लाभ सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात यावा, लोकवस्ती विकास कामांसाठी योजनेतून निधी उपलब्ध करून देऊन कामे करण्यात यावीत, तसेच शासनाच्या नव्या योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करून जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवाव्यात, अशा सूचना देण्यात आल्या.याशिवाय सफाई कर्मचाऱ्यांशी संबंधित विविध महत्त्वाच्या व गंभीर विषयांवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अतिरिक्त जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, जीतीन रहमान,मुख्य कार्यकारी अधिकारी नगरपरिषद,सतीश कुमार सोलंके,पुलिस अधीक्षक उमाशंकर कस्तुरे, ज़िल्हाचित्सक, सहायक समाज कल्याण अधिकारी प्रदीप भोगले,तसेच नगर परिषदेचे मुख्याधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कार्यालयात सफाई कर्मचाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाल्यानंतर राज्यमंत्री शेरसिंग डागोर यांनी पत्रकार देवेंद्र ढाका यांच्या निवासस्थानी भेट देत ढाका कुटुंबीयांशी यश ढाका प्रकरणात सविस्तर माहिती घेत चर्चा केली, यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यासोबत या प्रकरणात सखोल चौकशी करून ढाका कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याचे सांगितले, यावेळी परिसरातील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली.

# आधार माणुसकीतर्फे विधवा मातांचा सन्मान व ब्लँकेट वाटप

अंबाजोगाई दि १३ (प्रतिनिधी)- तालुक्यातील श्रीपतरायवाडी येथे नुकतेच महिला दिनाचे औचित्य साधून झालेल्या विविध स्पर्धेत महिलांनी सहभाग घेऊन स्पर्धेचा आनंद घेतला. यानिमित्त आधार माणुसकीच्या उपक्रमांतर्फे विधवा मातांचा सन्मान करून त्यांना ब्लँकेट वाटप करण्यात आले.

या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सुमनताई पवार या होत्या. कवी प्रा. मुकुंद राजपंखे, प्रा. सविता बुरांडे, कवयित्री शितल बोधले, जयश्री गुळवे, संध्या पवार, मयुरी मजगे, प्रेमा बर्दापूरकर, सुलक्षणा पवार, सामाजिक कार्यकर्ते मनोहर कराड यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक आधार माणुसकीच्या उपक्रमाचे प्रमुख ॲड.संतोष पवार यांनी केले. यावेळी महिला दिनानिमित्त गावातील विधवा माता, गरीब व गरजू १५० मातांचा सन्मान करून त्यांना ब्लँकेट भेट देण्यात आले.



महिला दिनानिमित्त झालेल्या संगीत खुर्ची स्पर्धेत मोहर अशोक हंगे (प्रथम), लता गोविंद तारळकर (व्दितीय), सीमा संतोष पांचाळ (तृतीय), तळ्यात मळ्यात स्पर्धा : रोहिणी तारळकर (प्रथम), श्रीकन्या जाधव (व्दितीय), सोनाली जाधव (तृतीय), लिंबू चमचा स्पर्धा : अनुसया नंदकिशोर अस्वले (प्रथम), श्रीकन्या जाधव (व्दितीय), राजश्री तारळकर (तृतीय), रोहिणी अस्वले (उत्तेजनार्थ) यांनी पारितोषिक मिळवले. या पारितोषिकाचे स्वरूप गालिचा असे होते. सावित्रीबाई व महात्मा फुलेंनी संघर्ष केल्याने महिलांना शिक्षणाची संधी मिळाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेत सर्वांना समान अधिकार दिल्याने महिलांना न्याय मिळाला. आता समाजानेही महिला, पुरूष ही विषमता दूर करून महिलांना स्वातंत्र्य दिले पाहिजे असे आवाहन प्रा. राजपंखे यांनी केले. सविता बुरांडे यांचेही भाषण झाले. शिवानंद गुळवे यांनी सूत्रसंचालन केले. श्रीकन्या जाधव व यशश्री दत्ता माने यांनी मनोगत व्यक्त केले. रामकृष्ण पवार, अनंत निकते व गावातील महिलांनी उपस्थितांचे स्वागत केले.

## आष्टीत आज-माजी आ.धोंडे यांच्या निवासस्थानी 'दावत-ए-इफ्तार'चे आयोजन



आष्टी दि १३ (प्रतिनिधी)- पवित्र रमजान पर्वाचे औचित्य साधून आष्टी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही सर्वधर्मसमभाव आणि बंधुभावाचे दर्शन घडवणाऱ्या 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.आज शनिवार दि. १४ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता हा सोहळा पार पडणार आहे. यातून सामाजिक एकोप्याचा मोठा संदेश दिला जाणार आहे.आष्टी-पाटोदा-शिरूर मतदार संघाचे माजी आमदार माजी भीमरावज धोंडे यांच्या आष्टी येथील निवासस्थानी या इफ्तार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 'माजी आ.भीमराव धोंडे मित्र मंडळ,आष्टी- पाटोदा-शिरूर' यांच्या वतीने या कार्यक्रमाची जय्यत तयारी करण्यात आली आहे.रमजानचा पवित्र महिना हा त्याग, शांती आणि संयमाचा संदेश देतो.दिवसभर कडक उपवास (रोजा) करणाऱ्या मुस्लिम बांधवांसाठी सूर्यास्ताच्या वेळी रोजा सोडण्याच्या प्रक्रियेला (इफ्तार) अनन्यसाधारण महत्त्व असते.याच इफ्तारच्या निमित्ताने सर्व धर्माचे आणि समाजाचे नागरिक एकत्र येऊन स्नेहभोजन करतात.यातूनच समाजात बंधुभाव, एकोपा आणि सामाजिक सलोखा वाढीस लागतो. हीच गौरवशाली परंपरा जपत आष्टीत या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.दरवर्षीप्रमाणे यंदाही या कार्यक्रमाला आष्टी शहरासह पंचक्रोशीतील विविध क्षेत्रांतील मान्यवर,राजकीय नेते,समाजसेवक, व्यापारी,युवक आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. रमजान महिन्याच्या या मंगलमयी आणि पवित्र वातावरणात संपन्न होणाऱ्या या 'दावत-ए-इफ्तार' कार्यक्रमास सर्व समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याची शोभा वाढवावी, असे जाहीर आवाहन आयोजक माजी आ.भीमराव धोंडे मित्र मंडळ' यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## यूपीएससी परीक्षेत यश मिळवलेल्या निखिल तांबे यांचा संजय कोठारी यांच्याकडून सत्कार



जामखेड दि १३ (प्रतिनिधी)- जैन कॉन्फरन्स चतुर्थ झोन, दिल्ली आणि कोठारी प्रतिष्ठान यांच्या वतीने UPSC परीक्षेत यश मिळवलेल्या आयपीएस अधिकारी निखिल काशिबा तांबे यांचा त्यांच्या माता-पित्यांसह सत्कार करण्यात आला. हा सत्कार समारंभ सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांच्या हस्ते पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. धनंजय भोसले होते.जमखेड तालुक्यातील अरणगावचे सुपुत्र निखिल तांबे यांनी अवघ्या २२ व्या वर्षी णझडउ परीक्षेत ५१७ वा क्रमांक मिळवत मोठे यश संपादन केले. यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी म्हणाले की,कोठारी प्रतिष्ठानच्या माध्यमातून आम्ही गेल्या ३८ वर्षांपासून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करत आहोत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करावीत हा आमचा उद्देश आहे. निखिल तांबे यांनी मिळवलेले यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. धनंजय भोसले यांनी आपल्या मनोगतात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन, सातत्य आणि जिद्द असेल तर कोणतेही ध्येय अशक्य नाही. निखिल तांबे यांचे यश हे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी निखिल तांबे आणि त्यांच्या माता-पित्यांचा शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी लहू शिंदे, डॉ. दत्ता मोटेगावकर, वडील काशिबा बलभीम तांबे, सौ. संगीता तांबे(आई), कृष्णा सोनवणे, अनिल निगुडे, माऊली भोरे आदी उपस्थित होते.

## गॅस मिळेना म्हणून कोळशाच्या भात्यावर चहा



पिंपळवंडी दि १३(प्रतिनिधी)- शहराप्रमाणे ग्रामीण भागातही गॅस सिलेंडर मिळत नसल्यामुळे ग्रामीण भागातील हॉटेल व्यवसायावर गॅस टंचाईची समस्या भेडसावत असून व्यावसायिक अडचणीत सापडला आहे.गॅस सिलेंडरला पर्याय म्हणून आडगळीत पडलेला कोळश्यावर चालणारा भाता पुन्हा वापरात आणताना पिंपळवंडी येथील हॉटेल व्यावसायिक अंकुश येवले कोळश्यावरील भात्यावर चहा बनविताना छायाचित्र दिसत आहे.

# कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे उच्च शिक्षणात अमुलाग्र बदल होतील-प्राचार्या डॉ.शिखरे

गेवराई दि.१३ (प्रतिनिधी) - कृत्रिम बुद्धीमत्ता हे अत्यंत प्रगत असे आधुनिक तंत्रज्ञान आहे. त्यामुळे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रात परिवर्तन होईल. विशेष करुन उच्च शिक्षण क्षेत्रातील बदल हे अमुलाग्र व दुरगामी असतील असे मत प्राचार्या डॉ.रजनी शिखरे यांनी व्यक्त केले.

त्या महिला महाविद्यालय गेवराई येथे कृत्रिम बुद्धीमत्ता, सामाजिक परिवर्तन, समानता आणि मानवी भविष्य या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या.महिला महाविद्यालय गेवराई येथे कृत्रिम बुद्धिमत्ता, सामाजिक परिवर्तन, समानता आणि मानवी भविष्य या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या उद्घाटक म्हणून र.भ.अट्टल



महाविद्यालयच्या प्राचार्या डॉ.रजनी शिखरे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की कृत्रिम बुद्धिमत्ता हि आजच्या डिजिटल युगातील महत्त्वाची तांत्रिक क्रांती असून तिच्यामुळे मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्राबरोबर उच्च शिक्षण क्षेत्रातही अमुलाग्र व दुरगामी असे बदल घडत आहेत. अध्यापन, संशोधन आणि ज्ञान निर्मितीच्या प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव वाढत असून विद्यार्थ्यांनी या तंत्रज्ञानाचा सकारात्मक व सृजनशील वापर करणे आवश्यक आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे बिजभाषक राजीव गांधी केंद्रीय विद्यापीठ अरुणाचल प्रदेश येथील प्रोफेसर डॉ.विनोदकुमार यादव आपल्या मार्गदर्शनपर भाषणे झाली.यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.दादासाहेब मोटे यांनीही विचार व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.तात्याराम सोंडगे म्हणाले की, कृत्रिम बुद्धिमत्ताचा मानवी जीवनावर होणारा परिणाम लक्षात घेऊन या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे व प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. उद्घाटन समारंभाचे सूत्रसंचालन सहसमन्वयक डॉ.संगीता आहेर यांनी केले. अतिथींचा परिचय डॉ.संजय भेदेकर यांनी करून दिला तर संयोजक प्रोफेसर डॉ.दत्ता तंगलवाड यांनी आभार मानले. समारोप समारंभाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.नामदेव शिनगारे यांनी केले. अतिथींचा परिचय प्रा.डॉ. रामहरी काकडे यांनी करून दिला तर कार्यक्रमाच्या शेवटी समन्वयक प्रा.डॉ. राजाभाऊ चव्हाण यांनी आभार मानले.

# केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षेत शिंदे बंधूंचे यश पद्माकर शिंदे जिल्ह्यात प्रथम,राज्यात ३१ वा



माजलगाव (प्रतिनिधी):- केंद्रप्रमुख विभागीय स्पर्धा परीक्षेचा निकाल दि.१३ मार्च जाहीर झाला असून या परीक्षेत माजलगाव तालुक्यातील पद्माकर चंद्रकांत शिंदे आणि प्रकाश चंद्रकांत शिंदे या शिंदे बंधूंनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.या परीक्षेत पद्माकर चंद्रकांत शिंदे यांनी जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवत राज्यात ३१ वा क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे माजलगाव तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या मेहनतीमुळे आणि सातत्यपूर्ण अभ्यासामुळे हे यश संपादन झाल्याने अनेक शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणादायी ठरत आहेत. त्यांच्या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. प्रकाश चंद्रकांत शिंदे यांनी देखील या स्पर्धा परीक्षेत यश मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे. शिंदे बंधूंच्या या यशामुळे तालुक्यातील शिक्षकांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून अनेक शिक्षकांना या क्षेत्रात पुढे येण्यासाठी प्रेरणा मिळत आहे. या यशानिमित्त शिंदे बंधूंचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी शिक्षक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष रमेश फपाळ, राष्ट्रमाता जिजाऊ शिक्षक सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विलास शेजुळ, सचिव हनुमान होके, मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष उत्तम पवार तसेच पत्रकार वैजनाथ घायतिडक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित मान्यवरांनी शिंदे बंधूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांच्या या यशामुळे तालुक्यातील शिक्षकांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी उत्साह वाढेल, असा विश्वासही व्यक्त करण्यात आला. या उल्लेखनीय यशामुळे शिंदे कुटुंबिय, मित्रपरिवार आणि सहकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# मनसेच्या संकल्पनेतून उद्या बीडमध्ये डान्स स्पर्धा

बीड दि १३ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संकल्पनेतून व म्हाळसा महिला प्रतिष्ठाण, बीड यांच्या वतीने नारी शक्ती - तुमच्या कर्तृत्वाला सलाम या उपक्रमांतर्गत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दि. १५ मार्च २०२६, रविवार, सायंकाळी ४ ते रात्री १० वाजेपर्यंत हॉटेल ओलीव्ह, नगर रोड, बीड येथे होणार आहे. या स्पर्धेत महिलांना आपली कला सादर करण्याची संधी मिळणार असून स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे. १० ते १७ वर्षे वयोगटातील मुलींसाठी एक गट तर १७ वर्षांपुढील सर्व महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आला आहे. स्पर्धेसाठी १७ वर्षांपुढील महिलांसाठी प्रथम बक्षीस ७००० रुपये ठेवण्यात आले असून व्दितीय ५००० व तृतीय ३००० क्रमांकाच्या विजेत्यांनाही आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत. उत्तेजनार्थ तीन पैठणी साड्या चे बक्षीस ठेवण्यात आले आहे.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून मनसे नेते दिलीप (बापू) धोत्रे, मनसे सरचिटणीस संतोष (भाऊ) नागरगोजे, मनसे सरचिटणीस रिटाताई गुप्ता, मनसे बीड जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे, वक्फ बोर्ड अध्यक्ष समीर काझी, डी.वाय.एस.पी. पूजा पवार व शिक्षण अधिकारी प्रिया पाटील उपस्थित राहणार आहेत.तर या स्पर्धेचे आयोजन वर्षाताई जगदाळे (मनसे राज्य उपाध्यक्ष, अध्यक्ष - म्हाळसा महिला प्रतिष्ठाण, बीड) यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून मयुरी बाबर (सचिव - म्हाळसा महिला प्रतिष्ठाण, बीड) या समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.तरी स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मुली व महिलांनी ७३८५४०८९९९, ९२८४९३७१३२, ८३०८९५५९४१, ९८२२५१३८७९ या क्रमांकांवर संपर्क साधून नाव नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पोलिसांवर धारदार वस्तू व दगडाने हल्ला केल्याच्या आरोपातून बाळासाहेब मोरे सह तिघांची निर्दोष मुक्तता

बीड दि १३(प्रतिनिधी)- पोलिसांवर धारदार वस्तू व दगडाने हल्ला करून सरकारी कामात अडथळा आणल्याच्या आरोपाखाली दाखल करण्यात



अॅड.योगेश टेकाडे

आलेल्या सेशन केस क्र. २११/२०१९ या प्रकरणात येथील सत्र न्यायालयाने आरोपी बाळासाहेब उर्फ बाळू मोरे, मधुकर काटवटे व आत्माराम कवडे यांची निर्दोष मुक्तता केली. सदर निकाल सत्र न्यायाधीश राजेश नेरलेकर यांनी दिला.या प्रकरणातील फिर्यादी पोलीस कर्मचारी अर्जुन राख (ब.न. १०२८) हे त्यावेळी चौसाळा येथे कार्यरत होते. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. १३ मे २००९ रोजी सुमारे ११.३० वाजण्याच्या सुमारास अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी पथकासह नेकनूर परिसरात गस्त घालत असताना पारगावकडून येणारी कमांडर जीप क्र. चक २३-ए-१७२ ही वाहनात मोठ्या प्रमाणात प्रवासी बसवून तसेच काही प्रवासी पाठीमागे लटकावून अवैधरित्या प्रवासी वाहतूक करताना दिसली. त्यामुळे संबंधित वाहन चालकास थांबवून ती जीप पोलीस चौकी नेकनूर येथे आणण्यात आली.त्यानंतर सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास जीपमधील काही प्रवासी तसेच त्यांच्या सोबत आलेल्या इतरांनी चौकीसमोर येऊन वाद घातला. त्यावेळी आरोपी बाळू मोरे पुढे येऊन तू आमची गाडी चौकीला कशी काय आणली असे म्हणत फिर्यादीचे गचोरे धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. त्याच्यासोबत आलेल्या इतरांनीही अचानक हल्ला करत लाथाबुक्के, दगड तसेच धारदार वस्तूने मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या गणवेशाचा शर्ट फाटला तसेच खांद्यावरील शोल्डर पट्टी तुटली व त्यांना दुखापत झाली. या घटनेमुळे सरकारी कामात अडथळा निर्माण झाल्याचा आरोप करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी आरोपींविरुद्ध भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३३२, ३५३, ३२३ व ५०४ अन्वये गुन्हा नोंद करून तपास तपास पूर्ण झाल्यानंतर आरोप पत्र दाखल करण्यात आले होते तसे हा खटला सत्र न्यायालयात चालविण्यात आला. सुनावणीदरम्यान अभियोजन पक्षाकडून एकूण नऊ साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आली तसेच विविध कागदपत्रे न्यायालयासमोर सादर करण्यात आली.मात्र खटल्याच्या सुनावणीदरम्यान साक्षीदारांच्या जबाबात अनेक विसंगती आढळून आल्या तसेच अभियोजन पक्षाने सादर केलेला पुरावा आरोपींविरुद्धचा गुन्हा संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्यास अपुरा असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे न्यायालयाने आरोपी बाळासाहेब मोरे, मधुकर काटवटे व आत्माराम कवडे यांची निर्दोष मुक्तता केली. प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. योगेश टेकाडे यांनी आरोपींची बाजू भक्कमपणे मांडली. या कामकाजात ॲड. वैभव होळकर, ॲड. मोनाली सोनवणे व ॲड. अक्षय जाधव यांनी सहकार्य केले. त्यामुळे या प्रकरणातील प्रभावी वकिलीबद्दल ॲड. योगेश टेकाडे यांचे कायदेवर्तुळात कौतुक होत आहे.

## गेवराई न.प.तील आदर्श सेवा केंद्र कक्षात कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्याने नागरिकांची कामे रखडू लागली

गेवराई दि.१३ (प्रतिनिधी) - नगरपरिषद शासकीय कार्यालयातील आवक-जावक कक्षात कर्मचारी उपस्थित राहत नसल्यामुळे महत्त्वाच्या फाईली, अर्ज आणि पत्रांची नोंदणी रखडली असून नागरिकांना कामासाठी तासनतास वाट पहावी लागत आहे. वेळेवर नोंदवही न मिळणे किंवा कर्मचारी अनुपस्थित राहिल्याने कामे प्रलंबित राहत आहेत. ज्यामुळे न.प.प्रशासकीय कामकाजात दिरंगाई होऊन सामान्य नागरिकांची मोठी अडचण होत आहे. नगरपरिषद प्रशासनाच्या आवक-जावक विभागात कर्मचारी उपस्थित राहत नसल्यामुळे नागरिकांचे अर्ज स्वीकारणे, पत्रांची नोंद करणे किंवा पोचपावती मिळणे अवघड झाले आहे. यामुळे कामात विलंब होत असून सर्वसामान्य जनतेला नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. गेवराई नगरपरिषद कार्यालयातील आवक-जावक विभागाचे कर्मचारी उपस्थित राहत नसल्यामुळे नगरपरिषद कार्यालयातील महत्त्वाच्या कागदपत्रांची, प्रस्तावांची नोंदणी रखडली आहे. यामुळे कामात विलंबासह कायदेशीर समस्या निर्माण होऊ लागल्या आहेत. न.प.आवक-जावक विभागाचे कर्मचारी वेळेवर उपस्थित राहत नसल्यामुळे शासकीय/निमशासकीय कार्यालयातील दैनंदिन पत्रव्यवहार, कागदपत्रांची नोंदणी आणि महत्त्वाच्या फायली वेळेवर न पोहोचल्याने कामांचा प्रचंड खोळंबा होतो. यामुळे महत्त्वाच्या फाईल्स गायब होणे किंवा नोंदवही अद्ययावत न राहिल्याने कामकाजावर परिणाम होऊन गैरसोय वाढते, तसेच टपाल प्रलंबित राहते. नवीन पत्रांची आवक किंवा जावक नोंदवहीत नोंद न झाल्याने पत्रांचा मागोवा घेणे अवघड झाले आहे. महत्त्वाचे अर्ज, फाइल्स आणि टपाल संबंधित विभागाकडे वेळेवर न पोहोचल्याने निर्णय प्रक्रिया मंदावत आहे. जर जावक नोंदवही नसेल तर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई (गुन्हा दाखल) करण्याची मागणी केली जात आहे. छोट्याशा हलकर्जीपणामुळे कर्मचाऱ्यांच्या कामावर परिणाम होऊन गैरसोय निर्माण होत आहे. त्यामुळे आवक-जावक विभागातील वेळेवर उपस्थित न राहणाऱ्या कर्मचाऱ्यावर मुख्याधिकारी विक्रम मांडूरके काय कारवाई करणार हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे.




जुन्या काळात आठवणीत नेणारे रमणीय पुस्तक

# ‘‘शिरगुळा’’

**या शब्दाचा अर्थ म्हणजे रांगोळीचा मुरुमी दगड. शेतात या मऊशार दगडाच्या घड्या वर घड्या असतात. त्या उकरून काढून स्वच्छ धुवून, वाळवून, जात्यात दळून यापासून रांगोळी बनवली जाते. कदाचित आत्ताच्या पिढीला रांगोळी बनण्याची ही प्रक्रियाच माहिती नसेल. पण या नावाने कवी प्रभाकर साळेगावकर यांचं ललित लेखाचं एक पुस्तक नुकतंच आलंय. जे बीड मधल्या आसावरी प्रकाशनाने प्रकाशित केलंय. आणि जेष्ठ साहित्यिक भारत सासणे यांनी या ललित संग्रहासाठी प्रस्थावनेचे शब्द दिले आहेत. विष्णू थोरे यांनी सुंदर असं मुखपृष्ठ दिलंय. आणि हे पुस्तक ज्या मातीत निपजले त्या साळेगाव ला लेखकाने अर्पण केले आहे.**

हे पुस्तक स्वतः प्रभाकर साळेगावकर यांनी देवराष्ट्रे इथल्या बाराव्या साहित्य संमेलनात मला दिलं. जे मी कालपासून अखंडपणे वाचतो आहे. या संग्रहातल्या ओळी समजून घेतो आहे. उद्याच दिनांक १४ मार्च २०२६ रोजी या संग्रहाचे प्रकाशन साळेगाव जिल्हा बीड इथं मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. तत्पूर्वी हा संग्रह नुकताच वाचून झाला. म्हणून माझ्या मनातली गोष्ट तुमच्या पुढे ठेवावी वाटली म्हणून हा शब्द प्रपंच.

एकंदरीत या ललित संग्रहात प्रभाकर साळेगावकर यांच्या बालपणापासून आजवरच्या हृदय आठवणींचा पट उलगडलाय. पंचवीस लेखातून या पुस्तकात लेखकाच्या बालपणीच्या अनेक आठवणींना स्पर्श केला गेलाय. जो वाचताना वाचक एका वेगळ्याच विश्वात रमून जातो.

साधारण १९६८/१९७० चा काळ. त्यावेळच्या भोवतालच्या राजकीय, सामाजिक, आणि सांस्कृतिक परिस्थितीचं आकलन, शिवाय त्याची पुस्तकातून आजच्या काळाशी केलेली बदलाची तुलना अधिक भावणारी आहे. त्या वेळी अस्तित्वात असलेल्या चालीरीती या सांप्रत काळाच्या लोकजीवनाचा भाग होऊन गेल्याचे साळेगांवकरजी नमूद करतात. सुपा एवढे मोठे काळीज घेऊन वावरणारी त्या काळातली हरिभाऊ, होळकर मामा यांच्यासारखी खरी माणसे या संग्रहात शब्दांकित झाली आहेत. जुन्या काळाचा नव्याशी नेहमीच संघर्ष राहिला आहे. पण त्या मागचे योग्य तपशील अगदी नेमकेपणाने या शिरगुळा मधून व्यक्त झाले आहेत.

मराठवाड्याच्या मातीत धुळवडीला खेळल्या जाणाऱ्या ‘डोबी’या पर्यावरणपूरक सणाविषयी साळेगावकर लिहितात तेंव्हा ते वाचताना मीच त्या चिखलात छाती इतका डुंबलो असल्याचा आभास मला होतो. प्रत्येक लेखकाच्या वाट्याला यायलाच हवे असे एक समृद्ध बालपण गोष्टीरूपाने या संग्रहात आहे. टुरिंग टॉकीज ही त्या काळातली अशीच समृद्ध गोष्ट. जी गावोगावच्या जत्रेत कणात मारून खेळ दाखवायची. अनिल आणि बंडू दोघेही तिथं पिक्चर बघायला गेल्यावर लोकांच्या उंचीमुळे समोर पडदा दिसेना म्हणून हाताने वाळू गोळा करून त्याचा ढीग करून त्यावर ते खुर्चीसारखे बसतात. पण बिलंदर लोक बसल्या जागी पायाने वाळू पोखरतात. आणि ढिगावर आरामात बसलेल्या पोरांना पाडतात याची भारीच गोष्ट साळेगावकर यांनी लिहिली आहे. आपल्यातला साहित्यिक घडण्याची प्रक्रिया सांगताना साळेगावकर आपल्या शाळेच्या रम्य आठवणीत रमून जातात. तिथे भेटलेल्या शिक्षकांच्या तळमळीची, त्यांच्या शिकवण्याच्या खुबींची, आणि शाळेतल्या केलेल्या उपक्रमांच्या विषयी कृतज्ञता ते इथे व्यक्त करतात.

सुगंधी झाला नळा या लेखातील एक वाक्य जणू त्या जुन्या काळाची दृश्यमानताच लालित्यपूर्ण शब्दातून घेऊन आले आहे. ‘‘ आता इथूनच इस्तु नेते अन्? पेटू घालते असं म्हणतच चार तुराट्यात दोन खांडं घेऊन मोठ्या झपक्यात देवयीबाई इस्तु घेऊन गेल्या‘‘ ललित साहित्याच्या दीर्घ परंपरेत इतकी सात्विक सहजता विरळ. अशा अनेक लालित्यपूर्ण गोष्टींचा वानवळा तुम्हाला शिरगुळा मध्ये दिसेल. करडीचे घरच्याघरी तेल काढण्याची प्रक्रिया एका आठवणी सोबत प्रस्तुत लेखात आली आहे. या लेखाच्या शेवटी पाल पडलेले तेल खाल्लेल्या बंडूला घेऊन काळजीत बसलेली साळेगावकर यांची आई वाचकाच्या मनात ठसून जाते. लेखकाचे खरे लेखन कसब ‘जांभळवढा’हा लेख लिहिताना लागले आहे. जांभळवढा परिसराचे केलेले लालित्यपूर्ण वर्णन वाचून कोणालाही ते ठिकाण स्वप्नवत वाटेल. ते पहायची अपार उत्कंठा लागेल. पण या लेखाचा समारोप करताना कोणाचेही काळीज चर्र करेल अशी अगतिकता या लेखात लेखकाने भरली आहे.

हॉस्पिटल मध्ये शेवटच्या घटका मोजत असलेल्या बापाची अखेरची इच्छा विचारून घेणारा हळवा कवी आणि त्या कवीची आपल्या बापाच्या व्यक्तिमत्वावर लिहिलेली कविता या संग्रहात वाचून तुमचेही डोळे नक्कीच पाणावतील. जिवाभावाचा सवंगडी अनिल गेल्यानंतर साळेगावकर यांची अशीच झालेली घालमेल खूपच अस्वस्थ करणारी आहे.

शब्दांच्या ठिपक्यांनी काढलेली ही आठवणींची रांगोळी लोकांना प्रचंड आवडणार ही काळ्या दगडावरची रेघ आहे. पण ललित साहित्यात या पुस्तकामुळे मोठी भर पडलीय हे मी खूप जबाबदारीने बोलतो आहे. पु ल.देशपांडे,अण्णा भाऊ साठे, दि.बा.मोकाशी,शंकरपाटील,ना. सं. इनामदार, व. पू. काळे, वि.स.खांडेकर, श्रीनिवास विनायक कुलकर्णी, कल्पना दुधाळ, आणि त्यानंतर याच मांदियाळीत प्रभाकर साळेगावकर यांचं ‘‘शिरगुळा‘‘ येऊन थांबते. यात अजूनही कांहीं मोजकी पण अत्यंत महत्वाची अशी कांहींनावे येतील. माझ्या अल्प आकलनानुसार मी फक्त माझे मत नोंदवतो आहे.मुळात ललित लेखक म्हणून नावारूपाला येणे हीच लाखात एक गोष्ट. पण हे शिवधनुष्य पेलून केवळ शब्दांनी अनगड धनुष्याचीप्रत्यंचा ताणणाऱ्या थोरामोठ्यांच्या यादीत प्रभाकर साळेगावकर हे नाव घ्यावेच लागेल असे मला वाटते.

म्हणूनचहे पुस्तक आपण आवर्जून घ्यावे. वाचावे. मी ‘‘शिरगुळा’’ या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभास अनंत शुभेच्छा देतो. पुस्तकास सुयश चिंतितो. आणि पुस्तकातल्या शब्दांची किमान ओळख व्हावी या उद्देशाने केलेल्या माझ्या विवेचनाच्या दोन शब्दास आता विराम देतो.

धन्यवाद.

■■■

**शिरगुळा**
(ललित लेखसंग्रह)
**– प्रभाकर साळेगावकर.**
आसावरी प्रकाशन. बीड.
पृष्ठे १०४. मूल्य १५०/–

## लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याची

# ३४ व्या ऊस गाळप हंगामाची सांगता

वडवणी (प्रतिनिधी): लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५–२६ या ३४ व्या ऊस गाळप हंगामाचा यशस्वी सांगता समारंभ दि.१३ मार्च, २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. १२२ दिवसांच्या ऊस गाळप हंगामात ६.७१ लाख मे.टन ऊसाचे यशस्वीरित्या गाळप करून या गाळप हंगामाची सांगता गव्हान पुजनाने करण्यात आली.



तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५–२६ या ऊस गाळप हंगामाचा सांगता समारंभ शुक्रवार दि.१३ मार्च २०२६ रोजी कारखान्याचे जेष्ठ संचालक तथा साखर संघाचे उपाध्यक्ष मा.आ.श्री.प्रकाश दादा सोळंके, जेष्ठ संचालक मा. श्री.धैर्यशील काका सोळंके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली कारखान्याचे चेअरमन श्री विरेंद्र दादा सोळंके यांच्या हस्ते गव्हाण पुजन करून करण्यात आली .या प्रसंगी व्हा.चेअरमन श्री जयसिंह भैया सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीसह कारखान्याचे सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.या प्रसंगी गाळप हंगामात ऊस तोड मजूर, ट्रॅक्टर चालक, मुकादम यानी उत्कृष्टपणे काम करत प्रथम, द्वितीय क्रमांक पटकावणाऱ्यांचा मा. चेअरमन, मा. व्हाईस चेअरमन व सचालक यांच्या हस्ते सत्कार करून सन्मान करण्यात आला.यावेळी प्रास्ताविकपर मार्गदर्शन करताना व्हाईस चेअरमन श्री. जयसिंग भैया सोळंके म्हणाले की, यावर्षी ऊस गाळप कमी झाले असले तरी कारखाना यंत्रणेने प्रतिदिन सहा हजार टनांपर्यंत गाळप केले आहे.आपल्या कार्यक्षेत्रातील ऊस कारखान्याबाहेर जाऊ नये यासाठी सर्वांनी सहकार्य करावे.असे आवाहन जयसिंह भैया सोळंके केले.तर चेअरमन श्री. विरेंद्रदादा सोळंके यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, मा. दादा व मा. काकांच्या मार्गदर्शनाने आपल्या कारखान्याने चालू हंगामात १२२ गाळप दिवसात ६.७१ लाख मे.टन ऊसाचे गाळप करून १०.६५% सरासरी साखर उताऱ्याने ३,६२,९०० क्किंटल साखरेचे उत्पादन घेतले आहे.या हगामात हे. सरासरी ८९ मे. टन ऊस ऊत्पादकता मिळालेली आहे.तसेच कारखान्यातील को–जन प्रकल्पाद्वारे ३,४४,७१,८०० युनिट वीज महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस निर्यात केली आहे. तर आसवणी प्रकल्पाच्या माध्यमातून १२७ दिवसात १,८०,१८,४६८ लिटर सिरप ईथेनाल उत्पादन घेण्यात आल्याचे चेअरमन विरेंद्र दादा सोळंके यांनी सांगत पुढील २०२६–२७ हंगामासाठी १३,५४० हेक्टर ऊस क्षेत्राची नोंदणी झाल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास कारखाना कार्यक्षेत्रातील सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, ऊस तोड मजूर, ट्रॅक्टर चालक यांचेसह कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर सर्व खातेप्रमुख कर्मचारी,कामगार उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. छगनराव जाधव यांनी केले.

# गॅस सिलेंडर दरवाढ करून मोदी सरकारकडून लाडक्या बहिणींची लूट–अ‍ॅड.श्रीनिवास बेदरे

गेवराई दि.१३ (प्रतिनिधी) : केंद्रातील भाजप प्रणित मोदी सरकारने घरगुती व व्यावसायिक ङझत्र गॅस सिलेंडरच्या किमतीत केलेली वाढ हि सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय करणारी आहे.



अलीकडेच घरगुती (१४.२ किलो) गॅस सिलेंडरच्या किमतीत ६० रुपये तर व्यावसायिक (१९ किलो) सिलेंडरच्या किमतीत ११५ रुपयांनी वाढ करण्यात आली आहे. आधीच प्रचंड महागाईने त्रस्त असलेल्या जनतेवर हि दरवाढ म्हणजे आणखी एक आर्थिक बोजा ठरला असून सामान्य नागरिकांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे असे मत अँड.श्रीनिवास बेदरे यांनी व्यक्त केले आहे.

पुढे बोलताना अँड.श्रीनिवास बेदरे म्हणाले की, गॅस सिलेंडर दरवाढीचा सर्वाधिक फटका घर चालविणाऱ्या भगिनींना बसत आहे. आधीच वाढत्या महागाईमुळे घरगुती बजेट कोलमडले असताना गॅसच्या दरवाढीमुळे कुटुंबांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. इंधन, गॅस आणि अन्नधान्य यांसारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत असताना भाजप प्रणित मोदी सरकारकडून त्यावर कोणतीही ठोस उपाययोजना होताना दिसत नाही. त्यामुळे देशात जनतेची उघड लूट सुरू असल्याची भावना निर्माण झाली आहे असे अँड.श्रीनिवास बेदरे म्हणाले की, देशात संभाव्य इंधन संकटाबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. ङझत्रच्या पुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्यास त्याचा परिणाम पेट्रोल–डिझेलच्या उपलब्धतेवर होऊन वाहतूक व्यवस्था, अन्नधान्याच्या किमती आणि सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होऊ शकतो. तसेच आजही देशातील सुमारे ८० टक्के इंधन आयात केले जाते. मोदी सरकार आत्मनिर्भर भारताचा नारा देत असले तरी प्रत्यक्षात पेट्रोल, डिझेल, गॅस व उछत्रसाठी परदेशांवर अवलंबून राहण्याची वेळ देशावर आली आहे. चुकीच्या आर्थिक व परराष्ट्र धोरणांमुळे देशाची अर्थव्यवस्था कमकुवत झाली असून महागाईचे ओझे सर्वसामान्यांवर टाकले जात आहे अशी टीकाही अँड.श्रीनिवास बेदरे यांनी केली. केंद्रातील भाजप प्रणित मोदी सरकारने गॅस सिलेंडरच्या दरवाढीवर तात्काळ नियंत्रण आणून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा असे अँड.श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# वडवणीचा भूमिपुत्र पार्थ सरवदे झाला सि.ए.

## कोष्टी समाजाच्या वतीने केला हृदय सत्कार

वडवणी(प्रतिनिधी): वडवणी येथील रहिवासी व नंतर पुणे शहरात स्थलांतरित झालेल्या सुधाकर सरवदे यांचा मुलगा पार्थ सरवदे अपार मेहनत व जिद्दीच्या जोरावर सीए (चार्टर्ड अकाऊंटंट) या परिक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. सर्वसामान्यांचा मुलगा थेट सीए पदापर्यंत पोहचला ,आज वडवणी शहरात कोष्टी समाजाच्या वतीने सी.ए. पदी नियुक्त झालेल्या पार्थ सरवदे याचा कोष्टी समाजाच्या वतीने गणपती मंदिर येथे मोठा गुणगौरव करण्यात आला.



याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी येथील आबुशा सरोदे नामक आजोबांनी मुलांच्या उच्च शिक्षणासाठी वडवणी गाव सोडले. आणि पुणे शहरात स्थायिक झाले, याचा फायदा मुलाला नाही ,पण नातवाला झाला , सुधाकर सरवदे यांनी टाटा मोटर्स कंपनीत काम करुन आपला मुलगा चि.पार्थ सरोदे याला उच्चशिक्षित केले. त्यांच्या या संघर्षाचे फळ आज मुलाच्या यशाने मिळाले आहे. त्याच्या या यशाबध्दल त्याचे आजोबा आबुशा सरोदे, वडिल सुधाकर आबुशा सरोदे, आई मिरा सुधाकर सरोदे, ह.भ.प. नवनाथ महाराज चिंनके,ह.भ.प.सुधाकर महाराज चिनके,ह.भ.प.सुदाम महाराज खटावकर (सर),ह.भ.प. प्रकाश महाराज कुरकुटे (सर)कोष्टी समाजाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली रोकडे, सर्जेराव महाराज आळणे, नवनाथराव म्हेत्रे,दादासाहेब भंडारे, राजेभाउ फासे, पांडुरंग टकले, वैजनाथ डिगे,बळीरामजी बागडे ,विश्वनाथ दिवटे,अनिलराव म्हेत्रे,दिगाबर पधारे, लहु टकले , कल्याण वारे, वल्लभ गुरसाळी, नारायण गुरसाळी. सह गोष्टी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऊसतोडणी कामगारांच्या योजनांची अंमलबजावणी गतीने करा–आ.सुरेश धस

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या व्यवस्थापकीय व्यवस्थापकीय संचालक दीपा मुधोळ–मुंडे यांची भेट

पाटोदा / महेश बेदरे



आष्टी–पाटोदा–शिरूर मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांनी शुक्रवारी पुणे येथील सामाजिक न्याय भवनातील मध्यवर्ती कार्यालयात लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक तथा बीडच्या माजी जिल्हाधिकारी श्रीमती दीपा मुधोळ–मुंडे यांची भेट घेऊन ऊसतोडणी कामगारांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. काही दिवसांपूर्वीच त्यांनी महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल आमदार धस यांनी त्यांचे अभिनंदनही केले.

यावेळी आमदार सुरेश धस यांनी २०२२ मध्ये राज्य शासनाने स्थापन केलेल्या ऊसतोडणी कामगार कल्याण महामंडळाच्या माध्यमातून जाहीर करण्यात आलेल्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. ऊसतोडणी कामगारांची नोंदणी करून त्यांना ओळखपत्र देणे, कामगारांच्या मुलांसाठी शैक्षणिक सुविधा व वसतिगृहांची उपलब्धता, कामगारांना अपघाती विमा संरक्षण तसेच गळीत हंगामात बैलांच्या अपघाती मृत्यू अथवा जखमी झाल्यास देण्यात येणारे सानुग्रह अनुदान तातडीने मिळणे गरजेचे असल्याची मागणी त्यांनी केली.तसेच ऊसतोडणी कामगार महिलांसाठी आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करून देणे, गर्भधारणेच्या काळात सकस आहाराची व्यवस्था करणे आणि गळीत हंगामात बांधकाम कामगारांच्या धर्तीवर सेंट्रलाइज किचनच्या माध्यमातून मजुरांना सकाळी जेवणाचा डबा उपलब्ध करून देण्यासारख्या नाविन्यपूर्ण योजना राबविण्याची गरजही त्यांनी अधोरेखित केली.मागील दोन–तीन वर्षांत बीड जिल्ह्यातील अनेक ऊसतोडणी कामगार इतर जिल्ह्यांत गळीत हंगामासाठी गेल्यानंतर त्यांच्या बैलांचे अपघाती मृत्यू किंवा अपघात झाल्याच्या घटना घडल्या असून त्यांना अद्याप विमा व सानुग्रह अनुदान मिळाले नसल्याच्या तक्रारी आहेत. तसेच कारखाना परिसरात किंवा स्थलांतरित ठिकाणी मृत्यू झालेल्या ५० पेक्षा अधिक कामगारांच्या कुटुंबियांनाही अद्याप आर्थिक मदत मिळालेली नसल्याचा मुद्दा आमदार धस यांनी मांडत संबंधित कुटुंबांना तातडीने मदत देण्याची मागणी केली.याशिवाय गेल्या दोन–तीन वर्षांत महामंडळाच्या माध्यमातून वसतिगृह बांधकाम, मध्यवर्ती व विभागीय कार्यालयांची दुरुस्ती, पाणी फिल्टर खरेदी, ओळखपत्र वितरण आणि ‘आनंदाचा शिधा’ वाटप यांसारख्या कोट्यवधी रुपयांच्या निविदा प्रक्रियेची सद्यस्थिती काय आहे, त्या योजना प्रत्यक्षात कार्यान्वित आहेत की केवळ कागदोपत्री खर्च झाला आहे, याचीही माहिती घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.या सर्व मुद्द्यांवर सकारात्मक चर्चा झाली असून ऊसतोडणी कामगारांच्या हितासाठी पथदर्शी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत पुढील काळात आवश्यक पावले उचलली जातील, असे आश्वासन श्रीमती दीपा मुधोळ–मुंडे यांनी दिले.या भेटीदरम्यान कामगार मंडळाचे केंद्रे साहेब तसेच ऊसतोडणी कामगारांच्या अपघात विमा व वैद्यकीय उपचारांसाठी सक्रिय असलेले बीड येथील श्री. बबन माने उपस्थित होते.

### जाहीर प्रगटन
### (वारस प्रमाणपत्रा बद्दल )
**श्री.आर.बी.पोळ, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माजलगांव यांच्या न्यायालयात.**

(मार्फत विधिज्ञ :– श्री.व्ही.व्ही.फपाळ) क. दि. अर्ज नंबर १४३/२०२६

**अर्जदार :** १) इंद्रायणी भ्र. रामेश्वर शेंडगे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. शेलापुरी ता. माजलगांव जि. बीड. २) धनंजय पि. रामेश्वर शेंडगे, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. शेलापुरी ता. माजलगांव जि. बीड. ३) विजय पि. रामेश्वर शेंडगे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. शेलापुरी ता. माजलगांव जि. बीड. ४) संजय पि. रामेश्वर शेंडगे, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. शेलापुरी ता. माजलगांव जि. बीड

विरुध्द निरंक

**प्रकरण :** मुंबई नियमन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे निळकंठ पि. सिताराम शेंडगे हे/या दि. ३०/१२/२०२३ रोजी शेलापुरी ता. माजलगांव जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आणि त्यांचे वरीलप्रमाणे वारस अर्जदार क्र. १ ते ४ यांनी कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे.

अर्जदार / गैरअर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, त्यांना शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार / गैरअर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १२/०३/२०२६ रोजी माझी स्वाक्षरी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **पुढील तारीख :– २३/०४/२०२६.**

**आदेशावरून,**
**अधिक्षक**
क.लिपीक **दिवाणी न्यायालय व.स्तर,माजलगांव**

### जाहीर प्रगटन
### (वारस प्रमाणपत्रा बद्दल )
**श्री.आर.बी.पोळ, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माजलगांव यांच्या न्यायालयात.**

(मार्फत विधिज्ञ :– श्री.टि.एन.कोल्हे) क. दि. अर्ज नंबर १३९/२०२६

**अर्जदार :** १) सोनाली भ्र.अशोक उगले, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. फुलेपिंपळगांव ता. माजलगांव जि. बीड. २) शिवराज पि. अशोक उगले, वय ११ वर्षे, अ.पा.क. आई सोनाली भ्र.अशोक उगले, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. फुलेपिंपळगांव ता. माजलगांव जि. बीड. ३) सिध्दी पि. अशोक उगले, वय १० वर्षे, अ.पा.क. आई सोनाली भ्र. अशोक उगले, वय ३१ वर्षे, धंदा घरकाम, रा. फुलेपिंपळगांव ता. माजलगांव जि. बीड. ४) सुशीलाबाई भ्र. केशव उगले, वय ७२ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर.

विरुध्द निरंक

**प्रकरण :** मुंबई नियमन VIII, १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **अशोक पि. केशवराव उगले** हे/या दि. १८/१०/२०२५ रोजी फुलेपिंपळगांव माजलगांव जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आणि त्यांचे वरीलप्रमाणे वारस अर्जदार क. १ ते ४ व्यांनी कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेचा अर्ज केला आहे.

अर्जदार / गैरअर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराचे असेही म्हणणे आहे की, त्यांना शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार / गैरअर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:– १२/०३/२०२६ रोजी माझी स्वाक्षरी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **पुढील तारीख : २३/०४/२०२६.**

**आदेशावरून,**
**अधिक्षक**
क.लिपीक **दिवाणी न्यायालय व.स्तर,माजलगांव**

### जाहीर प्रगटन
**मा.सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पाटोदा, ता.पाटोदा जि.बीड यांचे न्यायालयात**

किरकोळ दि.अर्ज १०२/२०२६ सतिष विरुध्द जनाबाई व ईतर मार्फत : श्री.आर.जी. औटे

ज्यापेक्षा **सिध्दीनाथ पि.विश्वनाथ घुमरे**, हे दिनांक २०/१०/२०२५ रोजी मयत झाले असुन खालील अर्जदार हे त्यांचे वारस आहेत.

**१)सतिश पि. सिद्दीनाथ घुमरे,** वय ४३ वर्षे, धंदा शेती

**गैरअर्जदार :** १) जनाबाई भ्र. सिध्दीनाथ घुमरे, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम २) नवनाथ पि. सिध्दीनाथ घुमरे वय ४५ वर्षे, धंदा शेती. ३) रेखा भ्र. अनिल जाधव, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम. अर्जदार व गैरअर्जदार क्र १ व २ यांचा पत्ता रा.अनपटवाडी, ता. पाटोदा जि. बीड. गैरअर्जदार क्र ३ यांचा पत्ता रा. पाटोदा, ता. पाटोदा जि. बीड.

ज्याअर्थी, अर्जदार व गैरअर्जदार क्र.२ हे मयताचे मुले असुन गैरअर्जदार क्र १ ही मयताची पत्नी आहे. तसेच गैरअर्जदार क्र ३ ही मयताची विवाहित मुलगी आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाहीत, असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत **सिध्दीनाथ पि. विश्वनाथ घुमरे**, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक. १२/०३/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पु.ता.२८/०४/२०२६.

आदेशावरुन
सहाय्यक अधिक्षक दिवाणी न्यायालय
क.स्तर, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड.
क.लिपीक

# पार्श्वभूमी

दि.१४ मार्च २०२६ शनिवार पान ६

### नवगण महाविद्यालयात ‘गीत बहार’ कार्यक्रम उत्साहात

परळी वैजनाथ : येथील नवगण महाविद्यालयात संगीत विभाग व सांस्कृतिक समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ‘गीत बहार’ या संगीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आबासाहेब हांगे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कलाकार प्रा. मनोज कुमार प्रकाश उपस्थित होते. या कार्यक्रमात जुन्या हिंदी चित्रपट गीतांचे सुरेल सादरीकरण करण्यात

पान २ वर

### चंपावती विद्यालयातील विद्यार्थ्यांची १८ गोल्ड मेडलला गवसणी

बीड दि.१३(प्रतिनिधी):- सायन्स ओलंपियाड फाउंडेशन तर्फे इयत्ता पाचवी ते दहावी च्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ओलंपियाड स्पर्धा परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या स्पर्धा परीक्षेमध्ये चंपावती विद्यालयातील विद्यार्थ्यांनी १८गोल्ड मेडल मिळवून चंपावती विद्यालयाचा यशाचा आलेख दिवसेंदिवस उंचावत आहे.पाचवी मधून चि. कैवल्य कुलकर्णी,चि.आदित्य चव्हाण,चि.समर्थ देवर्षी, सहावी मधून शक्या

पान २ वर

## अवैध मुरूम उत्खननावर पोलिसांचा छापा

### जेसीबीसह २ ट्रॅक्टर जप्त,एपीआय दराडे यांची कारवाई ; महसूल विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**बीड (प्रतिनिधी):- बीड शहरालगत असलेला डोंगर भागाची मुरूम माफीयांनी अक्षरश चाळणी केली आहे.बीड ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील आहेर वडगाव शिवारात सुरू असलेल्या अवैध मुरूम उत्खननावर बीड ग्रामीण पोलिसांनी धडक कारवाई करत जेसीबी मशीनसह दोन ट्रॅक्टर जप्त केले. ही कारवाई शुक्रवार, १३ मार्च रोजी करण्यात आली असून या प्रकरणामुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धती वरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.**

पोलिसांना आहेर वडगाव परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या मुरूम उत्खनन व उपसा सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे बीड ग्रामीण पोलिसांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाड टाकली. छाप्यादरम्यान काही जण कोणतीही अधिकृत परवानगी न घेता मुरूम उपसा करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.या कारवाईत पोलिसांनी एक जेसीबी मशीन व दोन ट्रॅक्टर असा मुद्देमाल जप्त केला. जप्त करण्यात आलेली सर्व वाहने पुढील कायदेशीर कारवाईसाठी नायब तहसीलदार जाधवर यांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. संबंधितांवर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व इतर लागू कायद्यांनुसार कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अतिश मोराळे, सतीश मुंडे, संतोष जयभाये आणि पोलीस अंमलदार युवराज चव्हाण यांच्या पथकाने केली.दरम्यान, परिसरात दीर्घकाळापासून अवैध उत्खनन सुरू असताना महसूल विभागाने दुर्लक्ष केल्याची चर्चा स्थानिकांमध्ये सुरू असून या प्रकरणामुळे महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले असून, आपल्या परिसरात अवैध उत्खनन किंवा गौण खनिजाची चोरी होत असल्याचे आढळल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देऊन सहकार्य करावे, असे सांगितले आहे.

### ह.भ.प.भगवान बाबा पात्रुडकरचे भाई गंगाभिषण थावरे कडुन स्वागत



माजलगाव दि.१३(प्रतिनिधी) पात्रुड येथील हभप भगवान बाबा पात्रुडकर यांनी पवित्र नर्मदा परिक्रमा करून आल्याबद्दल त्यांचे शेतकरी नेते भाई गंगा भीषण थावरे यांनी स्वागत करून त्यांचे आशीर्वाद घेतले आहेत.जगद्गुरू तुकोबारायांच्या रथापुढील दिंडीचे पहिले मानकरी ह. भ. प. भगवान बाबा पात्रूडकर (मातारबाबा) यांनी पवित्र नर्मदा परिक्रमा (३६०० कि.मी.) यशस्वीरीत्या पूर्ण करून आल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.या महान आध्यात्मिक कार्याबद्दल भाई गंगाभीषण थावरे यांनी अंतःकरणपूर्वक सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या प्रेरणादायी प्रवासामुळे समाजात भक्ती, श्रद्धा आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होत आहे.भगवान बाबांना पुढील आध्यात्मिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

### ना.पंकजाताईंचा पुढाकार ;सीईओचे आश्वासन

## विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख पदोन्नतीसाठीचे साखळी उपोषण मागे



बीड दि.१३ (प्रतिनिधी):-पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढा काराने व बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या आश्वासनानंतर व जिल्हा भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ योगेश क्षीरसागर यांच्या मध्यस्थीने उपोषण मागे घेण्यात आले.बीड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक (प्रा.) व प्राथमिक पदवीधर यांचे शासन निर्णय व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार टीईटी उत्तीर्ण शिक्षकांमधुन नियमाप्रमाणे तात्काळ पदोन्नती करावी, यासाठी पदोन्नती कृती समितीमार्फत तीन दिवसांपासुन सुरू असलेले साखळी उपोषण ना.पंकजाताई मुंडे, पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री महाराष्ट्र राज्य व मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या आश्वासनानंतर उपोषण मागे घेण्यात आले. याप्रसंगी जि.प. प्रशासनामार्फत मागण्या संदर्भात तात्काळ कार्यवाही होणार आहे. सोमवारपासून पदोन्नती प्रक्रिया सुरू करण्याचे पत्र निर्गमित करण्यात आले. संच मान्यता २०२५- २६ नुसार बीड जि प मध्ये ४८१ सहशिक्षकांची व ६ प्राथमिक

पान २ वर

## पैठण - पंढरपूर पालखी मार्गाच्या रस्त्यामध्ये कंत्राटदार कंपनीचे भले करण्यामागे अदृश्य हात कोणाचा ?

शिरूर कासार दि.१३(प्रतिनिधी):- शिरुर शहर हद्दीत सुरू असलेले पैठण- पंढरपूर पालखी मार्गाची शहरीभागातील हद्द सोडून निमुळत्या रस्त्याचा घाट कोणी घातला ? प्रत्यक्षात रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या नाल्यांचा व्यास चार मिटर सांगण्यात येत असला तरी एका नालीचा व्यास केवळ १.२५ प्रमाणे २.५ मिटर एवढा आहे. त्यामुळे कंत्राटदार कंपणीच्या भल्यासाठी प्रदिर्घ आणि शाश्वत विकाला सुरुंग लावणारे अदृष्य हात कोणाचे ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. महामार्ग, राज्यमार्गांची कामांचे अंदाजपत्रक संभाव्य काळातील किमान २५ वर्षाच्या कालावधीतील वाहतूक, वरदळ आणि रहदारीच्या विचाराधीन राहूनच तयार करण्यात येते. अंदाजपत्रकानुसार कुठल्याही ट्रक्चरचे अयुष्यमान १०० वर्षाचे असले तरी व्यास्तारीत कामासाठी त्या ट्रक्चरची दुरुस्ती करण्यात येते. राष्ट्रीय महामार्ग असो किंवा राज्य मार्ग शहरीभागात त्याची हद्द कायम करून किमान दुभाजकासह रस्त्याचे काम अनिवार्य आहे. शिरुर शहरात मात्र प्रगतीपथावर

पान २ वर



## बीड जिल्हा वकील संघात अॅड.विलास जोशी यांचा वाढदिवस साजरा

बीड प्रतिनिधी :-बीड जिल्हा वकील संघाचे सदस्य अॅड.विलास प्रभाकरराव जोशी यांचा आज दिनांक १३ मार्च रोजी वकील संघात वकील संघाचे जेष्ठ सदस्य बाळासाहेब बाहेगव्हाणकर यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात शाल श्रीफळ पुष्पहार देऊन साजरा करण्यात आला.

दिनांक १३ मार्च २०२६ रोजी विलास प्रभाकर जोशी यांचा वाढदिवस बीड जिल्हा वकील संघाचे



जेष्ठ सदस्य माजी अध्यक्ष अॅड.बाळासाहेब बाहेगव्हाणकर माजी अध्यक्ष अॅड.मंगेश पोकळे माजी अध्यक्ष अॅड.प्रशांत राजापूरकर माजी अध्यक्ष अॅड.बाप्पा औटी बीड जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष अॅड.रघुराज देशमुख माजी उपाध्यक्ष राहुल साळवे ज्येष्ठ सदस्य

पान २ वर

### डॉ.ढवळेंनी आरसा दाखवताच

## वनविभागाने कृत्रिम पाणवठे टँकरच्या पाण्याने भरले

बीड दि.१३ (प्रतिनिधी)-बीड तालुक्यातील बालाघाटावरील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी व सोमनाथवाडी परिसरातील वनक्षेत्रात वनविभागाने उभारलेले कृत्रिम पाणवठे कोरडे पडल्याने वन्यजीवांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. पाण्याच्या शोधात हरीण व काळवीट यांसारखे वन्यप्राणी मानवी वस्तीकडे धाव घेत असल्याने कुत्र्यांच्या हल्ल्यात किंवा वाहनांच्या धडकेत जखमी होण्याच्या तसेच मृत्यूच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची चिंताजनक स्थिती निर्माण झाली होती. तर वन्यप्राण्यासाठी बनवलेले कृती पानवटे कोरडे ठाक दिसून येतात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी हे प्रकरण उजेडात आणले व वन खात्याला आरसा दाखवताच जागे झालेल्या वन खात्याने टँकरचे पाणी टाकून कृत्रिम पानवटे



पाण्याने भरून टाकले. लिंबागणेश परिसरात गेल्या महिनाभरात एका काळवीटाचा जागीच मृत्यू झाला होता, तर दुसरे एक काळवीट गंभीर जखमी अवस्थेत आढळून आले

पान २ वर

## अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर सरकारचा निर्णय

## एप्रिल, मे, जून या तीन महिन्याचे धान्य एकदाच

मुंबई दि १३ (प्रतिनिधी)- अमेरिका आणि इराणच्या युद्धाचा परिणाम भारतात झाला आहे. या युद्धामुळे भारतात पुरवठा होणारा एलपीजी गॅसचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. युद्धाचे आता भारतामध्ये थेट मोठे परिणाम बघायला मिळत आहेत. या दरम्यानच प्रशासना कडून राज्यातील स्वस्त धान्य दुकानात तीन महिन्यांचे रेशन एकदाच देण्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. युद्धाचे परिणाम अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याने सरकार तीन महिन्यांचे धान्य रेशन दुकानांत पोहोचवणार आहे. राज्य भरातील ५१ हजारपेक्षा जास्त रेशन दुकानांत तीन महिन्यांचे धान्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. स्वस्त धान्य दुकानांत एप्रिल, मे आणि जून महिन्याचा धान्यसाठा पोहोचवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. भविष्यात युद्धाचे परिणाम तीव्र होण्याच्या भीतीने तीन महिन्यांचे धान्य वितरण होणार आहे. गहू आणि तांदळाचा तीन महिन्यांचा पुरवठा केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या

पान २ वर

## सेवानिवृत्त एसटी कर्मचाऱ्याला एसटी बसमधून उतरविले

बीड दि.१३ (प्रतिनिधी):-बीड आगारातील काही स्थानकातील वाहक चालक यांची मनमानी वाढली आहे.एका सेवानिवृत्त व्यष्टी कर्मचाऱ्याला बसमधून उतरविल्याची घटना घडल्याने संताप व्यक्त करण्यात आला आहे. या संदर्भात माहिती अशी की, दि. १३ मार्च २०२६ रोजी बीड ते परभणी गाडी एमएच २३ एयु६२३१ ही बसगाडी बीड ते परभणी साठी स्थानकात शुक्रवार दिनांक १३ रोजी सायंकाळी ६.१५ वाजता लावण्यात आली होती. बीड येथून परभणी कडे बस निघाली. या गाडीमध्ये बसण्यासाठी जिल्हा परभणी एस.टी. महामंडळाचे परभणी येथील सेवानिवृत्त बसचालक लक्ष्मण सुंदरराव नाकाडे हे बसमध्ये चढले. यावेळी बसमधील चालक आणि वाहक अमोल कोरडे यांनी उद्धट भाषा वापरली. अशी तक्रार करण्यात आली आहे. एसटी महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना खाली उतरले हे कितपत योग्य आहे हे एसटी महामंडळातील नियंत्रक अधिकारी तसेच वरिष्ठ विभागीय नियंत्रण अधिकारी एसटी महामंडळ बीड यांनी या प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.वाहक अमोल कोरडे यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आली आहे.

### अखिल भारतीय सावित्री बिग्रेडचा हिरकणी पुरस्कार स्वच्छतादुत योगीता गवळी यांना जाहीर

शिरूर कासार (प्रतिनिधी)-तालुक्याची कन्या व बीड जिल्हा परिषदेसाठी



स्वच्छ भारत मिशन आयकॉन म्हणून काम करणारी कु.योगीता आजीनाथ गवळी यांना नागपुर येथीलअखिल भारतीय सावित्री बिग्रेडच्या वतीने दिला जाणारा हिरकणी पुरस्कार जाहीर झाला असून नागपूर येथे मान्यवरांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे.नागपूर येथील अखिल भारतीय सावित्री बिग्रेड व थिऑसॉफीकल ऑर्डर ऑफ सर्व्हिस यांच्या संयुक्त विद्यमाने दरवर्षी सामाजिक,साहीत्यीक आणि सांस्कृतिकसह विविध क्षेत्रात उल्लेख कार्य करणाऱ्या महिलांचा हिरकणी पुरस्काराने सम्मान केला जातो. यावर्षाचेही पुरस्कार जाहीर झाले असून राज्याची

पान २ वर

### पशुसंवर्धनात आधुनिक तंत्रज्ञान आणून शेतकऱ्यांना सक्षम करणे गरजेचे-आ.धस

## उच्च दर्जाचे सिमेन उपलब्धता, एम्ब्रियो ट्रान्सप्लांट लॅबची स्थितीसह पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या रिक्त जागा भरण्याची अधिवेशनात मागणी

पाटोदा दि.१३(महेश बेदरे):- पशुसंवर्धन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी आणि पशुपालकांना सक्षम करणे ही काळाची गरज आहे, असे ठाम मत व्यक्त करत आ.सुरेश धस यांनी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पशुसंवर्धन व कृषी विभागाच्या मागण्यांवर चर्चा करताना सरकारचे लक्ष अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांकडे वेधले.

विधानसभा सभागृहात बोलताना धस यांनी राज्यातील पशुधन विकासासाठी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे अत्यावश्यक असल्याचे नमूद केले. राज्यात सुरू होणाऱ्या एम्ब्रियो ट्रान्सप्लांट प्रयोगशाळांची सद्यस्थिती काय आहे आणि त्या नेमक्या कुठे सुरू आहेत, याची स्पष्ट माहिती सरकारने सभागृहासमोर मांडावी, अशी मागणी त्यांनी केली. उच्च दर्जाच्या ‘रँग्लर’सारख्या सिमेनचा पुरवठा शेतकऱ्यांना



सुलभ व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी सांगितले की सध्या काही सिमेनची किंमत दहा हजारांपासून बारा-तेरा हजार रुपयांपर्यंत असल्याने सामान्य शेतकऱ्यांना त्याचा वापर करणे कठीण ठरत आहे. पशुसंवर्धन विभागातील पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या मोठ्या प्रमाणातील रिक्त जागांकडेही धस यांनी लक्ष वेधले. ग्रामीण भागात पशुधनासाठी वेळेवर आणि सक्षम सेवा मिळावी यासाठी या जागा तातडीने भरल्या गेल्या पाहिजेत, अशी मागणी त्यांनी केली. तामिळनाडूसारख्या राज्यांमध्ये शेतकरी पशुवैद्यकीय डॉक्टरांना देवासमान मानतात; मात्र महाराष्ट्रात अनेक ठिकाणी डॉक्टरांची उपलब्धता मर्यादित असल्याची वस्तुस्थिती त्यांनी अधोरेखित केली. यावेळी जनावरांच्या विमा योजनेचाही मुद्दा त्यांनी सभागृहात उपस्थित केला. मंत्री

पान २ वर

## आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठ्यावर परिणाम ; विरोधकांनी घाणेरडे राजकारण करू नये - शंकर देशमुख

बीड (प्रतिनिधी) :- आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे गॅस पुरवठ्यावर थोड्याफार प्रमाणात परिणाम झाला आहे त्यावर विरोधकांनी घाणेरडे राजकारण करू नये असे भाजप बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी म्हटले आहे की, अमेरिका-इराणमधील वाढत्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे आणि जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या अस्थिरतेमुळे इंधन व एलपीजी गॅस पुरवठ्याच्या साखळीवर परिणाम होत आहे. याचा परिणाम भारतासह अनेक देशांवर होत असून आपल्या देशातही काही ठिकाणी गॅस उपलब्धतेवर तात्पुरता परिणाम जाणवत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. नागरिकांना गॅसचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. आयात व्यवस्थापन, वितरण व्यवस्था आणि पर्यायी स्रोत याबाबतही केंद्र सरकार सक्रियपणे काम करत आहे. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकारही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहे आणि नागरिकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.अशा संवेदनशील परिस्थितीत सर्वांनी एकत्र येऊन देशहिताला प्राधान्य देणे आवश्यक आहे. मात्र काही विरोधी पक्ष या विषयावर तथ्यांऐवजी गैरसमज पसरवून आणि लोकांमध्ये भीती निर्माण करून घाणेरडे राजकारण करत आहेत. देश संकटाचा सामना करत असताना अशा प्रकारचे राजकारण अत्यंत गैर आहे. भारतीय जनता पार्टीच्या वतीने आम्ही सर्व नागरिकांना आवाहन करतो की, अफवांवर विश्वास ठेवू नये, संयम राखावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे.असे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकार शंकर देशमुख यांनी म्हटले आहे.




CMYK